## भोंदू अशोक खरात प्रकरणाचा सखोल तपास –सातपुते



**नाशिक** : भोंदूबाबा अशोक खरात याने पीडित महिलांचे धमकी देऊन शोषण केले. त्याच्यावर एकूण १२ गुन्हे दाखल असून या प्रकरणी पोलीस सखोल तपास करीत आहेत, अशी माहिती विशेष तपास पथकाच्या (एसआयटी) प्रमुख तेजस्विनी सातपुते यांनी मंगळवारी (दि. ७) पत्रकार परिषदेत दिली. पीडित महिलांनी धाडसाने फिर्याद दिली आहे. या पार्श्वभूमीवर आतापर्यंत ४६५० व्हिडीओ लिंक व्हायरल झाल्या होत्या. त्या सायबर टीमने डिलिट केल्या आहेत, शिवाय सोशल मीडियावरही वारंवार आक्षेपार्ह गोष्टी टाकल्या जात होत्या अशी ४५१ अकांऊट कायमची बंद करण्यात आली आहे. दरम्यान, खरातची माहिती ईडीलाही देण्यात आली आहे. हे प्रकरण संवेदनशील आहे. त्यामुळे चार्जशिट दाखल होत नाही तोपर्यंत काही गोष्टी गोपनीय ठेवणे गरजेचे आहे, असेही एसआयटी प्रमुख सातपुते यांनी यावेळी स्पष्ट केले.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २५९
www.ramprahar.com

◆ बुधवार, ८ एप्रिल २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


### अंतरंग


सिडकोचा १६,२५० कोटींचा अर्थसंकल्प सादर/२

मैत्री करून ११ जणांना ५० लाखांचा गंडा/६

स्वराज्य संघाने मराठा चषक जिंकला/८


# आरडीसीसी बँकेतील राजिपच्या ठेवी काढून घेण्याचा ठराव मंजूर

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी (आरडीसीसी) बँकेत असलेल्या रायगड जिल्हा परिषदेच्या सर्व ठेवी काढून त्या राष्ट्रीयकृत बँकेत ठेवाव्यात आणि राजिपचे सर्व आर्थिक व्यवहार राष्ट्रीयकृत बँकेतून करावेत तसेच रायगड किल्ला प्रधिकरणाकडे असलेली जिल्हा परिषदेची १० गुंठे जागा परत ताब्यात घ्यावी, असे दोन महत्त्वपूर्ण ठराव जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आले.



जिल्हा परिषदेची सर्वसाधारण सभा मंगळवारी (दि. ७) नियोजन भवन सभागृहात आयोजित करण्यात आली होती. जि.प. अध्यक्ष मंगेश वाकडीकर सभेच्या अध्यक्षस्थानी होते. उपाध्यक्ष मधुकर पाटील, अर्थ व शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे, कृषी व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील, महिला व बालकल्याण सभापती रसिका केणी, समाजकल्याण सभापती नारायण डामसे, जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले तसेच सर्व विभागप्रमुख सभेला उपस्थित होते.

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत असलेल्या जिल्हा परिषदेच्या सर्व ठेवी काढू त्या राष्ट्रीयकृत बँकेत ठेवाव्यात आणि जि.प.चे सर्व आर्थिक व्यवहार राष्ट्रीयकृत बँकेतून करावेत, असा ठराव कृषी व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील यांनी मांडला. हा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. जि.प.चे सर्व आर्थिक व्यवहार स्टेट बँकेतून करण्यात येतील, असे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी यावेळी जाहीर केले.

किल्ले रायगडावर जिल्हा परिषदेची १० गुंठे जागा आहे. ती सध्या रायगड किल्ला प्राधिकरणाला देण्यात आली आहे, परंतु प्राधिकरणाने त्यात काहीही काम केले नाही. प्राधिकरणाकडे देण्यात आलेली ही जागा जि.प.ने पुन्हा ताब्यात घ्यावी, असा ठराव अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी मांडला व तो मंजूर करण्यात आला.

ज्या गावांमध्ये जिल्हा परिषदेची शाळा आहे तेथे अंगणवाडी जर भाड्याच्या खोल्यांमध्ये भरत असेल, तर तेथील अंगणवाड्या जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये चालवाव्यात, अशी मागणी संतोष बैलमारे यांनी या सभेत केली. त्या अंगणवाड्या जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सुरू करण्यात येतील, असे आश्वासन शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे यांनी दिले.

या सभेत शिक्षण विभागातील अनागोंदी कारभारावर जोरदार चर्चा झाली. ज्यांना शिक्षणाचा अधिकार कायद्यान्वये जवळच्या शाळांमध्ये प्रवेश दिला पाहिजे त्यांना न देता या योजनेतून धनदांडग्यांच्या मुलांना प्रवेश दिला जातो. त्यामुळे गरीब विद्यार्थी चांगल्या शाळांमधील प्रवेशापासून वंचित राहतात, असे वैकुंठ पाटील यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. यावर जोरदार चर्चा झाली.

पाचाड येथे राजमाता जिजाऊ यांच्या पुण्यतिथीसाठी देण्यात येणारा निधी वाढवून मिळावा, अशी मागणी मानसी दळवी यांनी केली. ती मंजूर करण्यात आली. जिल्हा परिषदेने समूह शाळा योजना प्रभाविपणे राबवावी, अशी सूचना अनन्या गाताडे यांनी केली. अनंत गोंधळी, निकिता खारकर, सचिन राऊळ, निलेश कुंभार, दिलीप भोईर, गीता जाधव, संतोष बैलमारे, नमिता घारे, प्राची जाधव, प्रभाकर म्हात्रे, महेश म्हात्रे, अमित नाईक आदींनीही सभेच्या कामकाजात सहभाग घेतला.

यावेळी उपाध्यक्ष मधुकर पाटील यांनी दुखवटा ठराव मांडला. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार, रायगड जिल्हा परिषदेचे माजी सभापती भाई पाशिलकर आदींना श्रद्धांजली वाहण्यात आली, तर कृषी व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील यांनी अभिनंदनाचा ठराव मांडला.

### सभापतींना समित्यांचे वाटप

या सभेत जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी तीन सभापतींना विषय समित्यांचे वाटप केले. उपाध्यक्ष मधुकर पाटील यांच्याकडे बांधकाम व आरोग्य, चंद्रकांत कळंबे यांच्याकडे अर्थ व शिक्षण, तर वैकुंठ पाटील यांच्याकडे कृषी व पशुसंवर्धन विभागाची जबाबदारी देण्यात आली आहे. यापूर्वी रसिका केणी यांची महिला व बालकल्याण सभापतीपदी, तर नारायण डामसे यांची समाजकल्याण सभापतीपदी निवड करण्यात आली होती.

# आता एआयसाठी स्वतंत्र विभाग

### राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय; महावितरणची आर्थिक पुनर्रचना होणार

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याच्या प्रशासनात आधुनिक तंत्रज्ञानाचा अंतर्भाव करण्यासाठी आणि अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाने मंगळवारी (दि.७) अनेक क्रांतिकारी निर्णयांवर शिक्कामोर्तब केले. त्यानुसार आता कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि माहिती तंत्रज्ञानासाठी स्वतंत्र मंत्रालयीन विभाग स्थापन करण्यात येणार असून महावितरणची आर्थिक कोंडी फोडण्यासाठी तिची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यातील डिजिटल गव्हर्नन्सला गती देण्यासाठी सध्याच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाचे रूपांतर आता इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयात केले जाणार आहे. विशेष म्हणजे मंत्रालयीन विभाग, आयुक्तालय आणि सर्व जिल्ह्यांसाठी कायमस्वरूपी पदांचा समावेश असलेला स्वतंत्र आयटी संवर्ग (आयटी केडर) निर्माण केला जाईल. यामुळे सरकारी कामकाजात एआय आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे शक्य होणार आहे.

राज्यातील वीज वितरण व्यवस्थेला शिस्त लावण्यासाठी महावितरणच्या आर्थिक पुनर्रचनेचा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार महावितरण कंपनी आता शेअर बाजारात नोंदणीकृत होणार आहे. शासन हमी असलेल्या ३२ हजार ६७९ कोटी रुपयांच्या कर्जासाठी भांडवली बाजारात सरकारी रोखे आणले जातील. कृषी वीज वितरण व्यवसायाचे स्वतंत्र विभाजन करण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला, ज्यामुळे कृषी पंपांच्या वीज पुरवठ्याचे व्यवस्थापन अधिक सुलभ होईल.



नियोजन विभागांतर्गत कार्यरत असलेले महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर (एमआरसॅक) आता सोसायटीऐवजी कंपनी (कलम ८ अंतर्गत) म्हणून काम करणार आहे. या बदलामुळे रस्ते माहिती प्रणाली, नगररचना, जलयुक्त शिवार, आणि खाणकामाच्या अभ्यासाला व्यावसायिक गती मिळेल. त्याचप्रमाणे भू–स्थानिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी महाजिओटेक ही नवीन कंपनी स्थापन करण्यासही मंजुरी देण्यात आली आहे. याद्वारे विद्यार्थी आणि संशोधकांसाठी नवीन शैक्षणिक कार्यक्रम राबवले जातील.

महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम (एमआरडीपी) अंतर्गत आपत्ती व्यवस्थापनासाठी खासगी भांडवल आणि जागतिक बँकेकडून १६५ कोटींचा निधी उभारला जाणार आहे. आपत्तीग्रस्त नागरिकांना गृहकर्जात आणि लघु उद्योजकांना व्यवसायासाठी विशेष सवलती व विमा सुरक्षा दिली जाईल. कृष्णा खोऱ्यातील सांगली, कोल्हापूर आणि इचलकरंजी या शहरांमधील पुराचा धोका कमी करण्यासाठी प्रतिबंधक आराखडे तयार करण्यात येणार आहेत.

### शेतकऱ्यांना १२८ कोटी ६५ लाखांची मदत

**मुंबई :** राज्यात अवकाळी पावसाच्या नुकसानीपोटी एक लाख ८० हजार ५७४ शेतकऱ्यांना १२८ कोटी ६५ लाख रुपयांची मदत देण्यात आल्याची माहिती मंगळवारी (दि.७) मंत्रिमंडळ बैठकीत देण्यात आली. ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५दरम्यान झालेल्या अवकाळी पावसाने राज्यात शेतीचे सुमारे एक लाख १४ हजार ७५२ हेक्टर क्षेत्र बाधित झाले. यामुळे एक लाख ८० हजार ५७४ शेतकऱ्यांच्या शेती आणि शेतीमालाचे नुकसान झाले. या नुकसानभरपाईपोटी शेतकऱ्यांना १२८.८६ कोटी रुपयांची मदत करण्यात आली आहे. हे नुकसान प्रामुख्याने चंद्रपूर, धुळे, गडचिरोली, जळगाव, नाशिक, रायगड, सिंधुदुर्ग या जिल्ह्यात नुकसान झाले होते.

## निवडक

### नागपुरात स्फोटकांचा मोठा साठा आढळल्याने खळबळ

**नागपूर** : येथील दोसर भवन मेट्रो स्टेशनला लागून असलेल्या लांजेवार यांच्या घरासमोरील जागेत मंगळवारी (दि.७) १५ जिलेटिनच्या कांड्या, ५० डिटोनेटर्स आणि आठ कनेक्टर आढळले. याची माहिती मिळाल्यावर बॉम्ब शोध व नाशक पथकासहसह न्याय वैद्यक टीम आणि पेसोच्या पथकाला पाचारण करण्यात आले. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहे.

### वाशी शिक्षण मंडळातील दोघे लाचखोर जाळ्यात

**नवी मुंबई** : खारघर परिसरात मंत्रालयातील एका अधिकाऱ्याला लाच घेताना राज्यात केल्याची घटना ताजी असताना अगदी ४८ तासांत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून दुसरी कारवाई करण्यात आली आहे. वाशी येथील विभागीय शिक्षण मंडळात लाच घेताना विभागीय अध्यक्ष (वर्ग–१) येथे कार्यरत असणारे राजेंद्र माणिक आहिरे (वय ५५) आणि भंडार शाखा प्रमुख (वर्ग–३) येथील मनोहर लक्ष्मण पवार (वय ५०) यांना अटक करण्यात आली आहे.

## माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव अभियानाचा शुभारंभ



**मुंबई : प्रतिनिधी**

जागतिक आरोग्य दिनानिमित्त महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या महत्त्वाकांक्षी अभियानाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मंगळवारी (दि.६) शुभारंभ करण्यात आला.

या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह अन्य मंत्रिमंडळ सदस्य उपस्थित होते.

मंत्री आबिटकर यांनी अभियानाविषयी मंत्रिमंडळाला माहिती दिली. अभियानाविषयी माहिती देण्यात येणाऱ्या व्हिडीओ आणि पुस्तिकेचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आले.

या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य, विभाग, जिल्हा आणि ग्रामपंचायत स्तरावर समित्यांची स्थापना करण्यात आली असून ठराविक निकषांनुसार उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गावांना आरोग्यसंपन्न गाव म्हणून गौरविण्यात येणार आहे. यासाठी राज्य शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला असून ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच आरोग्य संस्थांना ६५.२५ कोटी रुपयांचे पुरस्कार देण्यात येणार आहेत.

माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव हे अभियान केवळ योजना नसून एक लोकचळवळ आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आरोग्याचा स्तर उंचावून निरोगी, सशक्त आणि समृद्ध समाज घडविण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याचा विश्वास यावेळी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे–बोर्डीकर यांनी व्यक्त केला.

## ऐरोलीत गोळीबार; एक जण जखमी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील ऐरोली परिसरात सोमवारी (दि.६) रात्री गोळीबाराची थरारक घटना घडली. यामध्ये एक जण जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार सोमवारी रात्री ११.५०च्या सुमारास अमित मौर्य आणि संदीप गवस हे दोघे ऐरोली सेक्टर १ परिसरात उभे असताना मोटरसायकलवरून आलेल्या अज्ञात इसमाने त्यांच्यावर अचानक गोळीबार केला. या हल्ल्यात अमित मौर्य यांच्या मानेत गोळी लागून ते जखमी झाले. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच रबाळे पोलीस ठाण्याचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पाहणीदरम्यान हल्लेखोराने सुमारे चार राऊंड फायरिंग केल्याचे समोर आले. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजमध्ये हल्लेखोर मोटरसायकलवर येऊन गोळीबार करताना दिसून आला आहे. या प्रकरणी अज्ञात आरोपीविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

## महाडमध्ये पिसाळलेल्या कुत्र्याचा धुमाकूळ

### पाच वर्षीय बालकासह अनेक जण जखमी

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील चोचिंदे गावात सोमवारी (दि.६) दुपारी पिसाळलेल्या कुत्र्याने हल्ला करून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण केले. या घटनेत पाच वर्षीय बालकासह पाच ते सात जण जखमी झाले असून त्यांच्यावर महाड ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पिसाळलेल्या कुत्र्याने आक्रमक होत गावातील लहान मुलांसह काही नागरिकांना चावा घेतला. या हल्ल्यात वेदांत अजय मोहिते (वय ५) याच्यासह निकलेश सुतार, अनिकेत सुतार, विनायक सकपाळ आदी जखमी झाले. घटनेनंतर ग्रामस्थांनी तत्काळ जखमींना रुग्णालयात हलवले.



या प्रकारामुळे चोचिंदे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून भटक्या कुत्र्यांचा वाढता उपद्रव गंभीर ठरत असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. प्रशासनाने तातडीने भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी पकड मोहीम व लसीकरण मोहीम राबवावी तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात येत आहे.

# 'महालक्ष्मी सरस'मध्ये रेकॉर्डब्रेक उलाढाल

### ग्रामीण महिलांच्या कष्टाचे नवी मुंबईत झाले चीज

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

ग्रामीण महाराष्ट्राच्या कष्टाचा सुगंध, कष्टकरी माऊलींच्या हाताची जादू आणि आधुनिक तंत्रज्ञानाची जोड यांचा अभूतपूर्व महोत्सव नवी मुंबईच्या वाशी येथे पार पडला. २४ मार्चपासून सुरू असलेल्या महालक्ष्मी सरस २०२६ प्रदर्शनाने निरोप घेताना यशाचे सर्व विक्रम मोडीत काढले. १३ दिवसांत तब्बल २२ कोटी रुपयांची रेकॉर्डब्रेक विक्री करून ग्रामीण महिलांनी सिडको एक्झिबिशन सेंटरमध्ये उद्योजकतेचा नवा इतिहास लिहिला.





नागरिकांनी ४९० स्टॉल्सवर दाखवलेला हा उदंड प्रतिसाद केवळ खरेदीपुरता मर्यादित नव्हता, तर तो ग्रामीण अर्थव्यवस्थेला दिलेला एक भक्कम आधार ठरला. शेवटचे सहा दिवस तर प्रदर्शनात जनसागराचा महापूर लोटला, ज्यामुळे आयोजकांनाही प्रदर्शनाचा कालावधी वाढवावा लागला.

यंदाच्या प्रदर्शनाचे सर्वात मोठे 'गेमचेंजर' ठरले ते म्हणजे आयोजकांनी पुरवलेल्या नाविन्यपूर्ण सुविधा. २५ किलोमीटरच्या परिघात मोफत घरपोच सेवा देण्याचा निर्णय महत्त्वाचा ठरला. आमच्या हातात पिशव्यांचे ओझे नको, असे म्हणणाऱ्या मुंबईकरांनी या सुविधेमुळे पोती भरून धान्य, मसाले, सेंद्रिय गुळ आणि हस्तकलेच्या वस्तूंची मनमुराद खरेदी केली. घरपोच सुविधेमुळे खरेदीचा वेग वाढला आणि उलाढालीने १० कोटींचा टप्पा ओलांडून थेट २२ कोटींवर झेप घेतली.

प्रदर्शनाच्या समारोपावेळी विविध श्रेणींमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गटांचा गौरव करण्यात आला. यामध्ये खाद्य विभाग केरळच्या एर्नाकुलम येथील नंदनम बचतगट (ज्यूस स्टॉल) याने प्रथम क्रमांक मिळवला. महाराष्ट्रातील बेस्ट सेलिंग स्टॉलमध्ये नांदेडच्या समृद्धी समूहाने (मोरिंगा पावडर) राज्यात अव्वल स्थान पटकावले.

नाविन्यपूर्ण उत्पादनात जळगावच्या गोपालकृष्ण समूह (मल्टीमिलेट खिचडी) आणि साताऱ्याच्या ज्ञानज्योती समूह (रोस्टेड भेळ) यांनी संयुक्तपणे प्रथम क्रमांकावर बाजी मारली. शेतकरी उत्पादक कंपनीतून सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड येथील कोकणकन्या एफपीसी आणि भंडारा जिल्ह्यातील लाखनी येथील शिखरधारा एफपीसी या दोन्ही संस्थांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला.

### सेलिब्रिटींची साथ अन् डिजिटल प्रतिसाद

पहिल्या दिवसापासूनच नामांकित कलाकारांनी हजेरी लावल्याने प्रदर्शनाचा दर्जा उंचावला. अनेक सेलिब्रिटींनी स्टॉल्सवर जाऊन महिलांशी गप्पा मारल्या आणि 'व्होकल फॉर लोकल'चे महत्त्व पटवून देणारे 'रील्स' सोशल मीडियावर शेअर केले. यामुळे तरुण पिढीही मोठ्या संख्येने या प्रदर्शनाकडे आकर्षित झाली.

## कुलदैवताय नमः







**पनवेल : शिवाजीनगर येथील कुलदैवतांची यात्रा उत्साहात पार पडली. यानिमित्ताने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी जाऊन दर्शन घेतले. यावेळी गाव अध्यक्ष कृष्णाशेठ ठाकूर, शशिकांत ठाकूर, विजय ठाकूर, रामचंद्र ठाकूर, किशोर ठाकूर, हरी ठाकूर, व्ही.के. ठाकूर आदींसह कुटुंबीय, ग्रामस्थ, महिलावर्ग उपस्थित होता.**

# बालकांच्या कर्करोग उपचारांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचा पुढाकार

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल) फाऊंडेशन आणि टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोगाच्या उपचारासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे.



या प्रकल्पाची प्रभावी आणि पारदर्शक अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी मुख्यमंत्री सहायता कक्ष बीपीसीएल फाउंडेशन आणि टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात हा त्रिपक्षीय सामंजस्य करार करण्यात आला आहे. या कराराद्वारे सर्व संबंधित घटकांमध्ये समन्वय राखला जाईल आणि प्रकल्पाच्या अंमलबजावणीस गती मिळणार आहे तसेच, प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यक्षेत्र आणि जबाबदाऱ्यांना सर्व संबंधितांनी मान्यता दिली असून, अंतिम सामंजस्य कराराध्ये ठरविण्यात येणाऱ्या अटी व शर्तींचे पालन करण्याबाबत सहमती दर्शविण्यात आली आहे.

या सामंजस्य करारासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुलांचे संरक्षण हे राज्याचे कर्तव्य आहे. कर्करोगाविरुद्ध लढण्यासाठी लवकर निदान , परवडणारे उपचार आणि जागरूकता आवश्यक आहे. शासन आणि समाज दोघांनी मिळून हे काम करणे गरजेचे आहे. टाटा मेमोरियल सेंटर यांनी बालक कर्करोग रुग्णांच्या ऑपरेशनच्या खर्चासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून खर्चाची मागणी केली होती. यासाठी विविध संस्थांनी एकत्रितपणे पुढाकार घेतला आहे. त्यामध्ये बीपीसीएल फाऊंडेशने मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आपला सहभाग नोंदवला आहे. त्यानुसार बीपीसीएल फाऊंडेशन टाटा मेमोरियल सेंटरमध्ये कर्करोगाचे उपचार घेणाऱ्या बालक रुग्णांच्या सहाय्यासाठी योगदान देणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील सामाजिक दायित्व (सीएसआर) उपक्रमांतर्गत बीपीसीएल फाऊंडेशन यांच्या योगदानाचे कौतुक करण्यात आले आहे. या प्रकल्पासाठी बीपीसीएल फाऊंडेशनकडून विशेष निधी सामाजिक दायित्वमध्ये देणार आहे. अशा या सामंजस्य करारामुळे बालकांच्या कर्करोग उपचारांतील आर्थिक अडथळे कमी होतात. गुणवत्तापूर्ण उपचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचत असतात. महाराष्ट्रात आरोग्यसेवांचा दर्जा उंचावत आहे. कर्करोगाशी झुंज देणाऱ्या बालकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्यासाठी या करारामुळे मोठी मदत होत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुले हे देशाचे भविष्य आहेत, त्यामुळे त्यांना कर्करोगासारख्या आजाराशी लढण्यासाठी मदत करणे आवश्यक आहे. या हेतूने प्रेरित होउन मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून जेवढी मदत करणे शक्य आहे तेवढी मदत करण्यात येत आहे, सामंजस्य करार घडवून आणण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी महत्वाचे योगदान दिले असून मुख्यतः गरीब व गरजू नागरिकांना, विशेषतः रुग्णांना, तातडीची आर्थिक मदत मिळवून देणे आणि संपूर्ण प्रणाली कार्यक्षम बनवणे हे मुख्य उद्दिष्ट असल्याची माहिती कक्षामार्फत देण्यात आली आहे.

# नवी मुंबई विमानतळावर उद्या आपत्ती रंगीत तालीम

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने सज्जता वाढविण्यासाठी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात ९ एप्रिल २०२६ रोजी आपत्कालीन रंगीत तालीम आयोजित करण्यात आली आहे. ही तालीम राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नवी दिल्ली, राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, मुंबई, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, रायगड तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व्यवस्थापन यांच्या संयुक्त



विद्यमाने पार पडणार आहे.

या रंगीत तालमीमध्ये विविध आपत्तीजन्य परिस्थितींचे प्रतिकात्मक सादरीकरण करून आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणेची कार्यक्षमता तपासली जाणार आहे. विमान अपघात, आग, वैद्यकीय आपत्कालीन परिस्थिती आदी प्रसंगांवर तात्काळ आणि समन्वयाने कशी कार्यवाही केली जाते, याचा सराव करण्यात येणार आहे.


यावेळी पोलीस, अग्निशमन दल, आरोग्य विभाग, आपत्कालीन सेवा यंत्रणा तसेच इतर संबंधित विभागांचा सक्रिय सहभाग राहणार असून, विविध यंत्रणांमधील समन्वय अधिक सक्षम करण्यावर भर दिला जाणार आहे. नागरिकांनी या काळात कोणतीही अफवा पसरवू नये आणि प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# सिडकोचा १६,२५० कोटींचा अर्थसंकल्प सादर

## पायाभूत सुविधा, कनेक्टिव्हिटी आणि गृहनिर्माणावर भर

**नवी मुंबई : बातमीदार**

सिडको महामंडळाने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी रु. १६,२५० कोटींचा अर्थसंकल्प सादर केला असून नवी मुंबई तसेच परिसरातील नियोजित शहरी विकासाला चालना देण्यासाठी पायाभूत सुविधा विस्तार, प्रादेशिक कनेक्टिव्हिटी बळकटीकरण आणि गृहनिर्माण विकासावर विशेष भर देण्यात आला आहे.




सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा आढावा घेताना सिडकोने रु. ९,७७४,२३ कोटींचे सुधारित उत्पन्न आणि रु. ९,७७०.२६ कोटींचा खर्च नोंदवला असून रु. ३.९७ कोटींचा अधिशेष साध्य केला आहे. मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांची अंमलबजावणी करतानाही आर्थिक शिस्त राखल्याचे यावरून स्पष्ट होते.

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी रु. १६,२५० कोटींचे उत्पन्न आणि रु. १६,१५० कोटींचा खर्च अपेक्षित असून रु. १०० कोटींचा अधिशेष अपेक्षित आहे.

प्रमुख पायाभूत सुविधा व कनेक्टिव्हिटी प्रकल्प (सन २०२५-२६ मध्ये कामाचा प्रारंभ झालेले प्रकल्प-

मेट्रो लाईन ८ :छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ जोडणारी ३४.८९ किमी लांबीची मेट्रो लाईन ८ विकसित करण्यात येत असून त्यामध्ये २० स्थानके असतील. २०३१ पर्यंत या मार्गावर दररोज सुमारे ९.८ लाख प्रवाशांची वाहतूक अपेक्षित आहे.

खारघर व्हॅली गोल्फ कोर्सचा ९ होलवरून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या १८ होलच्या चॅम्पियनशिप गोल्फ कोर्समध्ये विस्तार करण्यात आला आहे. येथे प्रोफेशनल गोल्फ टूर ऑफ इंडिया (PGTI) सिडको ओपन २०२५ स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. :

सिडकोतर्फे नवी मुंबई विमानतळाभोवती विशेष आर्थिक जिल्ह्यांच्या माध्यमातून आयकॉनिक सिटी डेव्हलपमेन्ट धोरण राबविण्यात येत आहे.

करंजाडे परिसरात सुमारे १०० हेक्टर क्षेत्रात विकसित होणाऱ्या एड्युसिटीमध्ये १० पर्यंत जागतिक दर्जाच्या विद्यापीठांना स्थान देण्याची योजना आहे. सिडकोने युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क, युनिव्हर्सिटी ऑफ अबर्डीन, इलिनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया आणि आयईडी इस्तितुतो युरोपेओ दी डिझाईन यांसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांबरोबर सामंजस्य करार (MoU) केले असून, नवी मुंबईला जागतिक शिक्षण केंद्र म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा ठरत आहे.

खारघर येथे १५५ हेक्टर क्षेत्रात आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेट पार्क विकसित करण्याची योजना असून येथे कॉर्पोरेट कार्यालये, आयटी सेवा, परिषद सुविधा आणि व्यावसायिक क्षेत्र विकसित करण्यात येणार आहे.

खारघर येथे प्रस्तावित आफ्रिकाभारत आंतरराष्ट्रीय विकास क्षेत्र हा जागतिक दर्जाच्या व्यवसाय, प्रदर्शन आणि सांस्कृतिक केंद्राच्या माध्यमातून भारतआफ्रिका आर्थिक सहकार्य अधिक बळकट करण्यासाठी राबविण्यात येणारा एक महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे. अंदाजे २० एकरवर उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पांतर्गत एकात्मिक व्यापार, परिषद, प्रदर्शन आणि अतिथ्यविषयक पायाभूत सुविधा यांसह सद्यस्थितीत सिडकोतर्फे अंतिमीकरण करण्यात येत असलेली एसपीव्ही संरचना यांचा समावेश असणार आहे.

सिडकोकडून नवी मुंबई विमानतळ प्रभाव क्षेत्र सुमारे २२५ चौ.किमी क्षेत्रात विकसित करण्यात येत असून भविष्यातील शहरी विकासाला चालना मिळणार आहे.

### जलसुरक्षेसाठी प्रकल्प

- कोंढाणे धरण ३५० एमएलडी
- हेटवणे धरण १५० ते २७० एमएलडी
- बाळगंगा धरण ३५० एमएलडी

कोंढाणे धरण जलावर्धन वितरण व्यवस्था प्रकल्पासाठीची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. तसेच सिडकोने टनेल बोरिंग मशीनच्या साहाय्याने एका महिन्यात सुमारे ८१२ मीटर टनेल खोदण्याचा राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला आहे.

### गृहनिर्माण उपक्रम

सिडकोकडून नेहमीच परवडणाऱ्या घरांच्या निर्मितीला प्राधान्य देण्यात आले आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात महामंडळाने १६,८७६ सदनिकांची गृहनिर्माण योजना जाहीर केली होती, ज्यास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.या यशाच्या पायावर पुढे जात, सन २०२६२७ मध्ये सुमारे १९,३०० सदनिकांची नवीन गृहनिर्माण योजना सिडकोकडून राबविण्याचे नियोजन आहे.

# मुरूडमधील ग्रॉइन बंधाऱ्याचे आज मंत्री नितेश राणे यांच्या हस्ते उद्घाटन

**मुरुड : रामप्रहर वृत्त**

मुरुड जंजिरा हे पर्यटनस्थळ असल्यामुळे पर्यटक मुरुडला खास ताजे मासे खाण्यासाठी येतात .मुरुड शहराला इतिहास असल्याने २ समुद्रातील जलदुर्ग व विशाल स्वच्छ सुंदर समुद्रकिनारी पाहण्यासाठी आलेल्या पर्यटकांना येथिल कोळी बांधव गेली अनेक वर्ष ताजी मासळी वाजवी दारात देतात व पर्यटकांचे मुरुडला येण्याबाबतचे आकर्षण वाढवतात अशा कोळी बांधवाच्या मासेमारीबाबत समस्या कडे शाहसनाने लक्ष दिले कोळीबांधवन गेली ३०पासून ज्याची प्रतीक्षा होती तो ग्रॉइन बंदर मंजूर करून त्याचे भूमिपूजन बंदर मंत्री नितेश राणे यांच्या हस्ते ८ एप्रिल सायंकाळी ५,३० वाजता होणार आहे सोबत महिला बालविकास मंत्री अदिती तटकरे, रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले, आमदार प्रशांत ठाकूर ,आम .महेंद्र दळवी, मेरिटाइम बोर्डाचे कार्यकारी अधिकारी प्रदोष पी उपस्थित राहणार आहेत

मुरूडचे मच्छिमार रोज सकाळी ५ वाजता उठून खोल समुद्रात मासेमारीसाठी जातात .हवामान चांगले असेल व नशीब साथ देईल तर जाळ्यात मासे मिळतात व मिळालेलं मासे मुरुड किनाऱ्यावर आणून मुरुड मासळी बाजारात विक्रीसाठी आणतात .परंतु आणताना त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते प्रथम मुरुड किनारीवर बोटी बांधण्यासाठी जेटी नसल्याने बोट वाळूत उभी करावी लागते .वाळूत लावताना बोटीचा खालील भाग वाळूत अडकतो व नुकसान होते ,दुसरे मासेमारीसाठी जाताना बोटीत जाळी चढवणे , डिझेलचे ड्रॅम चढवणे ,मासेमारीसाठी लागणार बर्फ नेण्याचे काम ४ फूट पाण्यातून डोक्यावर वाहून नेऊन करावे लागते ,त्यात मनुष्यबळ जास्त लागते व वेळही जास्त लागतो त्यात मासळीचा दुष्काळ असल्याने मच्छिमार सतत नुकसान सहन करत आहे

अदयावत जेटी झाल्यास बोट सुरक्षित धक्क्याला लावता येईल .जाळी ,डिझेल .नेणारा टेम्पो बोटी जवळपर्यंत जाईल ,भरती ओहोटीला समुद्रात जाणे सोपे होईल .काही वर्षापुरवी एकदरा किनायावर जेटी बांधण्यात आली पण चुकीची बांधल्याने फक्त मासे सुकवण्यासाठीच वापर होतो.

# पनवेल येथे 'इच्छांचे दीप प्रवाही' पुस्तकाचे शनिवारी प्रकाशन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

डॉ. प्रभाकर पटवर्धन आणि नीलाताई पटवर्धन या सेवाभावी दांपत्याच्या कार्यस्मृती जागवणारे तसेच 'डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रुग्णालय' यांच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या सेवावाटचालीचा सविस्तर आणि प्रेरणादायी आढावा घेणारे ज्येष्ठ पत्रकार, लेखक सुधीर जोगळेकर लिखित 'इच्छांचे दीप प्रवाही' या संग्राह्य पुस्तकाचे प्रकाशन शनिवार, दिनांक ११ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे होणार आहे.

या कार्यक्रमाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य सुहासराव हिरेमठ हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. सेवा, सामाजिक काम, संघटना आणि संस्थात्मक कार्य या विषयांवर ते मार्गदर्शक आणि प्रेरक विचार व्यक्त करतील.

प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल येथील प्रसिद्ध ज्येष्ठ नेत्र शल्यविशारद डॉ. सुहास हळदीपुरकर आणि धूतपापेश्वर कंपनी लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत पुराणिक हे उपस्थित राहणार आहेत.

'इच्छांचे दीप प्रवाही' हे पुस्तक डॉ. प्रभाकर पटवर्धन आणि नीलाताई पटवर्धन यांच्या वैद्यकीय आणि सामाजिक सेवाकार्याचा प्रेरणादायी प्रवास उलगडणारे आहे. पुढील पिढीसाठी प्रेरणा देणारे ठरेल.

# कर्जत उपजिल्हा रुग्णालयात डायलीसिस विभागाचे लोकार्पण

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरात असलेल्या उपजिल्हा रुग्णालयात डायलीसिस विभाग सुरु करण्यात आला. आज जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते या विभागाचे लोकार्पण करण्यात आले. या सुविधेमुळे तालुक्यातील रुग्णांना दिलासा मिळणार असून त्यांचा वेळ व पैसा वाचणार आहे. सध्या दोन डायलीसिस मशीन उपलब्ध असून लवकरच आणखी चार डायलीसिस मशीन येणार आहेत.



उपजिल्हा रुग्णालयात डायलीसिस विभाग तयार केला असून या विभागाच्या उदघाट्न सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते फीत कापून डायलीसिस विभागाचे उदघाट्न करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. नितीन शिंदे, वैद्यकीय अधिक्षक डॉ. विजय म्हसकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. किरण गुरव, भास्कर दिसले, नगरसेवक संकेत भासे, किशोर कदम, वैभव सुरावकर, रोहित ओसवाल, अभिषेक सुर्वे, दिनेश कडू, प्रदीप वायकर, राजेश शितोळे, नदीम खान आदी उपस्थित होते.

डॉ. म्हसकर यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रस्ताविकात डायलीसिसची सुविधा सुरु करण्यासाठी आमदार महेंद्र थोरवे यांनी पाठपुरावा केला. त्यामुळे हा विभाग सुरु होत आहे.' असे स्पष्ट केले. आमदार थोरवे यांनी, 'हल्ली या रुग्णालयाबद्दल काही तक्रारी येत नाहीत. याचा अर्थ येथे चांगले काम सुरु आहे. डॉ. म्हसकर येथे आल्यापासून सकारात्मक काम होत आहे. डायलिसीससाठी पनवेल, ठाणे, मुंबईकडे जावे लागत असे. हा उपचार खूप खर्चिक आहे. त्यासाठी आम्हीही आमच्या माध्यमातून मदत करीत असतो. आता आपल्याला उपजिल्हा रुग्णालयात डायलीसिसची सुविधा उपलब्ध झाली आहे. त्यामुळे संबंधित रुग्णांना त्यांचा लाभ घेता येईल.

# आईसकांडीवाले झाले हायटेक!

**तळा : प्रतिनिधी**

सध्या उन्हाळा सुरू झाला असून तापमानात वाढ झाल्याने या उन्हाळ्यात माणूस थंड पेयांकडे वळला आहे. उन्हाळा आला की गावोगावी फिरणारे अनेक लालपेटीमधे आईसकांडी,बर्फाचा गोळा घेऊन फिरणारे दिसतात.त्यातच आता तालुक्यात जत्रा उत्सव अनेक ठिकाणी चालू असून या जत्रा उत्सवात बच्चे कंपनी ते मोठ्यांपर्यंत आईसकँडीला मागणी चांगली आहे.



यापूर्वी असे गावोगावी फिरणारे आईसकांडी,बर्फाचे गोळे घेऊन फिरणारे हे साधीलालपेटी डोक्यावर घेऊन गावोगावी फिरायचे व गावच्या नाक्यावर बसून जोराने आईसफ्रुटवाले अशी हाक द्यायचे त्यावेळी सर्व लहान मुले गोळा होऊन आई जवळ हट्ट करून आणलेल्या पैशाने तो बर्फाचा गोळा, आठ आणे,एकरूपया याला घेतला जायचा व तो लहान मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद वेगळाच असायचा आता त्यात बदल होऊन मोटरसायकलवाले आले.ते गल्लीत मोहल्ल्यात,घराघरा समोर जावून हा व्यवसाय करावयास लागले आहेत.

आता काही हाताच्या बोटांवर मोजता येतील एवढेच हे आईसकँडीवाले तालुक्यात दिसत आहेत.मात्र त्यांच्यात बदल झाला असून ते हायटेक झाले आहेत.मोटारसायकलवरती व्यवस्थितपणे बांधलेली लालपेटी, समोरहॅन्डेलला लावलेला युपीआय क्यूआरकोड, त्याद्वारे पैसे घेण्याची व्यवस्था,गुगलपे,अशा आधुनिक पध्दतीने पैसे घेण्याची व्यवस्था आहे.तसेच आईसकांड्यांचे ५रू, १० रू,१५ रू असे सर्वसामान्य ते लहानमुलांपासून परवडणारे दर आहेत.तसेच हे आईसकांडी वाल्यांशी संवाद साधला असता ते म्हणाले आम्ही गावोगावी जाऊन आईसकांड्या दिवसाला एक ते दोन हजार रूपयांची विक्री होते त्यात एक हजार रूपयांमागे ३०० रूपये मिळतात असे दिवसाला सर्व खर्च वजा जाता जास्तीत जास्त ६०० ते ७०० रूपये मिळतात.

# महावितरणकडून 'इकॅमेक्स-२०२६'मध्ये विद्युत सुरक्षेचा जागर

**मुंबई : प्रतिनिधी**

इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या (इकॅम) वतीने गोरेगाव येथील बॉम्बे एक्झिबिशन सेंटरमध्ये 'इकॅमेक्स-२०२६' या तीन दिवसीय प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. यामध्ये महावितरणच्या प्रदर्शनीला केंद्रीय नवीन व नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांनी भेट दिली आणि विविध योजनांच्या अंमलबजावणीची माहिती घेतली.

गोरेगाव येथे 'इकॅमेक्स-२०२६'चे उद्घाटन केंद्रीय राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांच्याहस्ते झाले. विद्युत कंत्राटदारांनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून विद्युत क्षेत्राच्या माध्यमातून प्रगतीस हातभार लावावा असे आवाहन नाईक यांनी केले. तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात ऊर्जा



क्षेत्रात राज्याने देशात मोठी आघाडी घेतली आहे. अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी शाश्वत व स्वस्त विजेसाठी ऊर्जा परिवर्तनाचा 'रिसोर्स अ‍ॅडेक्वेसी प्लॅन' तयार केला आहे. त्यानुसार महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी ऊर्जा परिवर्तनाला मोठी गती दिली आहे. सौर ऊर्जेच्या योजनांद्वारे सद्यस्थितीत २० लाख ६६ हजार शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा सुरु झाला आहे. तर पीएम सूर्यघर मोफत वीज योजनेमधून आतापर्यंत ५ लाखांवर घरगुती ग्राहकांनी लाभ घेतला.

# कृषी उत्पन्न बाजारात भाजीपाला, फळे, सुका मेवा आणि मसाल्यांच्या दरात वाढ

**वाशी :** येथील घाऊक कृषी उत्पन्न बाजारात भाजीपाला, फळे, सुका मेवा आणि मसाल्यांच्या दरात मोठी वाढ नोंदवली जात आहे. अनेक प्रमुख वस्तूंच्या किमती सरासरी ४० टयांनी वाढल्या असून, त्याचा थेट परिणाम किरकोळ बाजारावरही झाला आहे. किरकोळ पातळीवर काही ठिकाणी १० ते २० टयांपर्यंत दरवाढ झाल्याने सर्वसामान्य नागरिकांना महागाईचा मोठा फटका बसत आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे कृषीमालावर परिणाम झाला आहे.

## दुखवटा

### अशोक पाटील



**नागोठणे :** पिगोंडे ग्रामपंचायत सरपंच संतोष कोळी याचे सासरे व रोहा पंचायत समिती सदस्य समृद्धी कोळी यांचे वडील वेलशेत गावातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अशोक तुळशीराम पाटील यांचे वयाच्या ६८ व्या वर्षी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने शनिवार दि. ४ एप्रिल रोजी त्यांच्या राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, तीन मुली, जावई,२ भाऊ, एक बहीण, वाहिनी, पुतणे तसेच नातवंडे असा मोठा परिवार असून कै. अशोक पाटील यांची दशक्रिया विधी सोमवार दि.१३ एप्रिल रोजी नागोठणे अंबा नदी घाटावर तसेच उत्तरकार्य गुरुवार दि.१६ एप्रिल रोजी त्यांच्या वेलशेत येथील राहत्या घरी होणार आहे.

## निवडक

### अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**पनवेल :** १६ वर्षीय अल्पवयीन मुली सोबत लग्न करून तिच्यावर अत्याचार करत तिला गरोदर केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात समीर पवार यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला. समीर याने १६ वर्षीय पीडित मुलीला राहत्या घरी बोलून तिच्यावर अत्याचार केले. त्यानंतर तिच्या सोबत लग्न केले. पीडित मुलगी गरोदर राहिली. तिला अलिबाग येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिची प्रस्तुती करताना ती अल्पवयीन असल्याचे डॉक्टरांच्या निदर्शनास आले. त्यानंतर अलिबाग पोलिसांना याची माहिती देण्यात आली आणि अलिबाग येथुन पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा ट्रान्सफर करण्यात आला.

### क्रेडिट कार्डमधून फसवणूक

**पनवेल :** क्रेडिट कार्ड मंजूर झाल्याचे सांगून लिंक पाठवली आणि क्रेडिट कार्डमधून एक लाख ३९ हजार रुपयांची ऑनलाईन फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी व्यक्तीविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात २ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. बबन श्रीपती शिंदे हे कामोठे, सेक्टर ३६ येथे राहत असून त्यांना अनोळखी ईसमाकडून फोन आला. आणि बँकेचे क्रेडिट कार्ड मंजूर झाले असून व्हाट्सअप द्वारे लिंक पाठवतो. ती लिंक उघडून माहिती भरण्यास सांगितले. लिंक मध्ये माहिती भरत असताना त्यांना शंका आल्याने त्यांनी लिंक बंद केली. आणि त्या इसमाचा फोन कट केला. अर्ध्या तासानंतर त्यांना ओटीपी आला. त्यानंतर मोबाईल क्रमांकावर रक्कम वजा झाल्याचे मेसेज आले. त्यांनी बँकेला फोन द्वारे सांगून क्रेडिट कार्ड ब्लॉक केले.

### सोन्याची चेन हिसकावली

**पनवेल :** चाकूचा धाक दाखवून एका वृद्ध महिलेकडील चार ग्राम वजनाची सोन्याची चेन हिसकावून नेल्याप्रकरणी अनोळखी व्यक्तीविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात १ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. जानकी टीसी या नवीन पनवेल, सेक्टर ११ येथे राहत असून त्या वॉकिंग करण्यासाठी घराबाहेर गेल्या होत्या. वॉकिंग झाल्यानंतर घरी येत असताना सोसायटीच्या पहिल्या माळ्यावर आल्या. त्यावेळी सोसायटीच्या जिन्यावरून २५ ते ३० वर्षीय अनोळखी व्यक्ती आला. त्याने तोंडाला मास्क आणि चष्मा घातला होता. त्याने चाकूचा धाक दाखवला आणि जानकी टीसी यांच्या गळ्यातील सोन्याची चेन त्याने हिसकावली. जानकी यांनी चेन पकडली यावेळी काही भाग तोडून घेऊन तो पळून गेला.

# पनवेल महापालिकेचे विकासासाठी पाऊल

## सहा वर्षांत १९०० कोटी रुपयांची विकासकामे ; 'सीडीपी'नुसार नियोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई महानगर क्षेत्रातील दुसरे आंतरराष्ट्रीय विमानतळ पनवेलमध्ये उभारल्याने शहराच्या विकासाला वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर मागील सहा वर्षांपूर्वी पनवेल शहरातील नागरिकांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा मिळण्यासाठी महापालिकेने तब्बल १९०० कोटी रुपयांची विकासकामे केली आहेत.



महापालिकेने २०१९मध्ये पुढील २० वर्षांचा शहर विकास आराखडा (सीडीपी) बनवला. या आराखड्यानूसार साडेचार हजार कोटी रुपयांची विकासकामे करण्याचे नियोजन करण्यात आले. या नियोजित कामांपैकी महापालिकेने ४० टक्के कामांचे ध्येय गाठले आहे. पुढील वर्षात यातील ६० टक्के कामे हाती घेण्याचा महापालिका प्रशासनाचा मानस आहे. पनवेल शहराची वाढती लोकसंख्या, विमानतळामुळे वाढणारी वर्दळ आणि आसपासच्या भागांचा वेगाने होणारा विस्तार लक्षात घेता हा आराखडा पायाभूत सुविधांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ पनवेल महापालिका क्षेत्राला लागून असल्याने शहराची ओळख जागतिक पातळीवर पोहोचली आहे. या दरम्यान महापालिकेचे तत्कालीन आयुक्त गणेश देशमुख यांच्या नेतृत्वाखाली २०१९ साली शहराचा पुढील २० वर्षांसाठीचा म्हणजे २०४१ पर्यंतचा शहर विकास आराखडा (सीडीपी) बनविण्यात आला. भविष्यातील शहराची गरज ध्यानात घेऊन सीडीपीत सूचवलेल्या कामांप्रति जसे शासनाच्या विविध योजना येतात याच योजनेतून या सीडीपीत सूचवलेल्या कामांवर टप्याटप्याने खर्च केला जातो.

महापालिका स्तरावर बनवलेल्या सीडीपीनुसार आतापर्यंत सर्वात मोठा खर्च घनकचरा व्यवस्थापनासाठी ६३७ कोटी रुपये करण्यात आले आहेत. पनवेल महापालिका क्षेत्रात शहरानुसार तळोजा परिसरात १० गावांचा ग्रामीण परिसर आहे. या गावांमधील शेतजमीनींवर शहर उभारण्यासाठी तेथे रस्त्यांचे जाळे, नाले, मलनिसारण व्यवस्था, जलसंधारण आणि पिण्याच्या पाण्याच्या सुविधा उभारण्याचे नियोजित आहे. आतापर्यंत सीडीपीनूसार महापालिकेने रस्ते बांधकामासाठी तब्बल ४९९ कोटी रूपये खर्च केले आहेत. तसेच पाणी समस्या सुटण्यासाठी महापालिकेने २८५ कोटी रुपये खर्च केले आहेत.

गावांगावातील आणि शहरातील पथदिव्यांसाठी महापालिकेने २१३ कोटी रुपये खर्च केले आहे. तत्कालीन आयुक्त देशमुख यांच्या काळात सीडीपी तयार करून प्रसिद्ध करून त्यावर खर्चाची सुरुवात झाली. आयुक्त मंगेश चितळे यांनीही याच विकासकामांना प्राधान्य देत सीडीपीनुसार अजून गतीने

> **पनवेल महापालिकेने नियोजित केलेल्या सीडीपीनुसार विकासकामे करत आहे. स्मार्ट, शाश्वत आणि संतुलित पनवेल शहर बनविण्यासाठी महापालिका कटिबद्ध आहे.**
> **-मंगेश चितळे,** आयुक्त, पनवेल महापालिका

काम करण्याची आखणी केली आहे. महापालिकेची सध्याची लोकसंख्या सुमारे १५ लाखांवर पोहचली आहे.

शाश्वत शहराचा विकास लक्षात घेऊन व्यापक शहर विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. यात रस्ते, पथदिवे, घनकचरा, पाणीपुरवठा यांसोबत भविष्यात झोपडपट्टी पुनर्वसन, शाळा, रुग्णालये, उद्याने, मैदाने, स्टेडियम आणि बसआगार यांसाठी महापालिकेला अजून वेगाने काम करावे लागणार आहे.

**सीडीपीनुसार आतापर्यंत झालेली व सुरू असलेली कामे**

पाणीपुरवठा २८५, मलनिसारण १०७, पावसाळी गटार ३३, घनकचरा व्यवस्थापन ६३७, रस्ते बांधकाम ४९९, पथदिवे २१३, आरोग्य ६४, शिक्षण ८१. यामध्ये शाळेसाठी भूखंडाची रक्कम आणि नवीन इमारतींचा समावेश आहे.

**उत्तम दळणवळणामुळे देशात पनवेल शहर अग्रस्थानी**

पनवेल तालुक्यात केंद्र व राज्य सरकार तसेच सिडको मंडळाच्या महत्त्वाकांक्षी रस्ते व दळणवळण प्रकल्पांमुळे शहराचे राज्यातील महत्त्व लक्षणीयरीत्या वाढणार आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, अटल सेतू, डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर, विरार-अलिबाग कॉरिडॉर, दिल्ली-मुंबई व मुंबई-बडोदा महामार्ग यांसारख्या प्रकल्पांमुळे पनवेल दळणवळणाचे प्रमुख केंद्र ठरणार आहे. कर्जत-पनवेल रेल्वे मार्ग, खांदेश्वर-तळोजा मेट्रो, हैद्राबाद मुंबई हायस्पीड रेल्वे आणि नवीन रेल्वे मार्गामुळे पनवेल शहराचे दळणवळण अधिक मजबूत होईल. नैना प्रकल्पांतर्गत सूमारे साडेआठ हजार कोटी रूपये खर्च करून सिग्नलविरहित रस्ते उभारले जाणार असून या सर्व प्रकल्पांमुळे पनवेल शहराचा वेग भविष्यात मुंबईला मागे टाकेल.

## पाठलाग करून व्यापाऱ्याची सोनसाखळी हिसकावली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कळंबोलीतील स्टील मार्केट परिसरात भरदिवसा थरारक प्रकार घडला असून, दुचाकीवरून जाणाऱ्या व्यापाऱ्याचा पाठलाग करत चोरट्यांनी तीन लाख रुपयांची सोनसाखळी हिसकावल्याची घटना सोमवारी दुपारी उघडकीस आली. या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

कळंबोलीतील ५५ वर्षीय व्यापारी हे त्यांच्या स्टील मार्केटमधील गोदामावरून दुचाकीने तळोजा येथे गेले होते. तळोजातून परत येत असताना दोन युवक त्यांच्या दुचाकीचा पाठलाग करत असल्याची त्यांना जाणीव झाली. सोमवारी दुपारी एक वाजून २० मिनिटांनी स्टील मार्केटमधील गोदाम क्रमांक १६४० समोरील रस्त्यावर त्यांच्या दुचाकीचा वेग कमी होताच, पाठलाग करणाऱ्या चोरट्यांपैकी मागे बसलेल्या युवकाने त्यांच्या गळ्यातील सुमारे तीन लाख रुपयांची सोनसाखळी हिसकावली.

या झटापटीत व्यापाऱ्याच्या मानेस दुखापत झाली. त्यानंतर त्यांनी तातडीने पोलीस ठाणे गाठले. पोलीस उपनिरीक्षक सतीश नवले यांनी घटनेची नोंद करून जखमी व्यापाऱ्याला उपचारासाठी पनवेल शहरातील नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयात पाठवले.

या घटनेनंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संशयितांचा माग काढण्यासाठी पथक नेमले आहे. यापूर्वी सोनसाखळी चोरीच्या घटना प्रामुख्याने महिलांना लक्ष्य करून घडत होत्या, मात्र आता दागिने घालणाऱ्या पुरुषांनाही लक्ष्य केले जात असल्याने नागरिकांमध्ये चिंता वाढली आहे. नवी मुंबई परिसरात वाढत्या रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण आणण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## पनवेलमध्ये खुशरंग संगीत महोत्सव उत्साहात ; रसिक मंत्रमुग्ध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि नादब्रह्म साधना मंडळ खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला खुशरंग संगीत महोत्सव संगीत रसिकांच्या साक्षीने आणि उत्स्फूर्त प्रतिसादात मोठ्या दिमाखात पार पडला.




पनवेल मार्केट यार्ड येथील सभागृहात सायंकाळपासूनच रसिकांची उपस्थिती पाहायला मिळाली. शास्त्रीय गायन, भजन आणि कथक नृत्य यांचा सुरेल संगम अनुभवताना रसिक मंत्रमुग्ध झाले. यावेळी नामवंत कलाकारांनी प्रभावी सादरीकरणातून सभागृहात सुरांची मैफल रंगवली.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या महोत्सवाचा शुभारंभ पं. गिरीश संझगिरी, हभप निवृत्तीबुवा चौधरी, पं.मारूती पाटील, पं. उमेश चौधरी, उस्ताद रफात खान नियाजी, नागनाथ पाटील व विनोद तोडेकर यांच्या हस्ते दीप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. महोत्सवात पहिले पुष्प पं. गिरीश संझगिरी यांनी गुंफले. त्यांनी आपल्या गायनाची सुरुवात राग 'पुरिया धनाश्री' मधील 'अब तो ऋतु मान' हा बडा खयाल तर तीन तालात 'बीत गये जुगवा पिहरवा' हा छोटा खयाल सादर केला. त्यानंतर "ज्ञानियांचा राजा"या अभंगाने आपल्या गायनाची सांगता केली. कार्यक्रमाचे दुसरे पुष्प पं. महेश कुलकर्णी यांनी गायनाची सुरुवात राग 'श्री कल्याण'मधील 'अजहून आये' बडा खयाल तर छोटा खयाल 'झननन बाजे पायलियां' सादर केला. त्यानंतर राग सोहनी मधील छोटा खयालाने आपल्या गायनाची सांगता केली. कार्यक्रमाचे तिसरे पुष्प पं. विनायक नाईक यांच्या संकल्पनेतून साकार केला.

गायन, वादन,नृत्य एक अविष्कार हा कार्यक्रम आर्या महाजन, ऋतुजा कुलकर्णी यांचे नृत्य आणि या नृत्याबरोबर विनायक नाईक व सहकाऱ्यांनी तीन तालामध्ये कायदे, तुकडे, रेळे यांचे वादन व जुगलबंदी सादर झाली. कार्यक्रमाचा समारोपही अत्यंत भारदस्त वातावरणात झाला. उस्ताद अस्लम खान यांचे शिष्य पं. उमेश चौधरी यांच्या सुरेल गायनाने झाली. त्यांनी आपल्या गायनाची सुरुवात 'बिहाग' रागातील 'श्रीराम श्रीराम जय जय राम' या बडा खयालने तर 'अब तो रट लागी'या छोट्या खयालाने केली. त्यानंतर खमाज रागामध्ये ठुमरी तसेच 'केतकी गुलाब जुही चंपक बन फुली' आणि शेवटी 'वैकुंठीच्या राया' या भैरवीने त्यांनी सांगता केली.

कलाकारांना संवादिनी साथ पं. विनायक ललित, स्मिता मनोहर, तर तबलासाथ विनायक नाईक, प्रसाद सुतार, महेश कानोळे तर पखवाज सोमदत्त माने व सूरज गोंधळी तसेच नृत्याबरोबर गायन साथ तनुश्री जोग व सुधींद्र बागल यांनी दिली तर सूत्रसंचालन सोपान आढाव यांनी केले. महोत्सव यशस्वी करण्यासाठी कलाकारांसह महोत्सवाचे निमंत्रक हभप वसंत पाटील, विनोद तोडेकर, अक्षय चौधरी, अनिल कोळी, जगदीश म्हात्रे, मच्छींद्र पाटील आणि सहकाऱ्यांनी मेहनत घेतली.

## चोरट्याने रोख रक्कम आणि मोबाईल पळवला

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

३२ वर्षीय तरुणाच्या हाताला चावा घेऊन आणि धारदार वस्तीने वार करून खिशातून पाच हजार रुपये आणि मोबाईल खेचून पळून गेल्याप्रकरणी अनोळखी व्यक्तीविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात ३ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

शेख रोशन शेख चांद हा यवतमाळ येथे राहत असून तो ट्रक मालकासह भिवंडी ठाणे येथे माल भरण्यासाठी आला होता. दोन एप्रिल रोजी ते औरंगाबाद व नागपूर येथे जाण्यासाठी निघाले. पनवेलला जेवण करण्याचे ठरवले. सायंकाळी साडेपाचच्या सुमारास मोबाईल व पाच हजार रुपये घेऊन पनवेल रेल्वे स्टेशन येथे ऑटो रिक्षाने आला. तो रिक्षा पकडण्यासाठी पायी चालत गांधी हॉस्पिटलच्या समोरील कामगार नाका येथे आला. रिक्षात बसत असताना त्याच्या पाठीमागून एक इसम आला आणि त्यांनी त्याच्या खिशातून पैसे काढण्याचा प्रयत्न केला.

यावेळी प्रतिकार केला असता त्या अनोळखी इसमाने त्याच्या हाताला चावा घेतला आणि चाकूने वार केला. तो चाकू त्याच्या छातीला लागला. त्यानंतर खिशात जबरदस्तीने हात घालून पाच हजार रुपये आणि मोबाईल फोन काढून घेऊन तो पळून गेला. यात शेख रोशन शेख चांद हा जखमी झाला.

## कळंबोलीत भाजपचा स्थापना दिन साजरा ; कार्यालयासमोर ध्वजारोहण

**कळंबोली : बातमीदार**

भारतीय जनता पक्षाचा ४६वा वर्धापन दिन कळंबोली येथे मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. यानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालयाची आकर्षक सजावट करण्यात आली होती.

यावेळी कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील यांच्या उपस्थितीत व त्यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण कार्यक्रम झाला. पक्ष कार्यालयात मान्यवरांच्या हस्ते पक्षध्वज फडकविण्यात आला.

या कार्यक्रमाला उपमहापौर प्रमिला पाटील, सभापती बबन मुकादम, जिल्हा चिटणीस रवी पाटील, उत्तर रायगड महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष प्रिया मुकादम मंडळ महिला मोर्चा अध्यक्षा मोनिका महानवर, युवा मोर्चा अध्यक्ष गौरव नाईक तसेच प्रभाग ७च्या नगरसेविका मनाली ठाकूर, प्रभाग ८च्या नगरसेविका बायजा बारगजे, प्रभाग ९च्या नगरसेविका दमयंती भोईर आणि प्रभाग १०च्या नगरसेविका सरस्वती कथारा, नगरसेवक रवींद्र भगत व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पक्ष कार्यालयात आकर्षक रोषणाई व सुंदर रांगोळी काढून उत्सवाचे वातावरण अधिक उजळविण्यात आले. तसेच संध्याकाळी ६ वाजता सेक्टर २० येथील तिथी बँक्वेट हॉलमध्ये सक्रिय कार्यकर्ता संमेलन आयोजित करण्यात आले. या संमेलनासाठी प्रमुख म्हणून उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी उपस्थित होते. मंडळ अध्यक्ष अमर पाटील तसेच सर्व नगरसेवक आणि सक्रिय कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.

## बीसीटी लॉ कॉलेजच्या विद्यार्थ्यांची मुंबई उच्च न्यायालयात शैक्षणिक भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) लॉ कॉलेज, न्यू पनवेल येथील तृतीय वर्ष एलएलबी (LL.B.) विद्यार्थ्यांसाठी मुंबई उच्च न्यायालय येथे शैक्षणिक भेट आयोजित करण्यात आली. ही भेट प्राचार्य सानवी देशमुख मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडली.

या शैक्षणिक भेटीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना न्यायव्यवस्थेचे प्रत्यक्ष ज्ञान मिळावे तसेच न्यायालयीन प्रक्रिया, परंपरा आणि कार्यपद्धती यांविषयी त्यांची समज अधिक दृढ करणे हा होता. या भेटीचे नियोजन व समन्वय प्रा. ऐश्वर्या मॅडम, प्रा. नेहा काची आणि प्रा. अनाम मॅडम यांनी प्रभावीपणे पार पाडले.

भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना विविध न्यायालयीन कक्षांना भेट देण्याची संधी मिळाली. त्यांनी सुरू असलेल्या खटल्यांची कार्यवाही प्रत्यक्ष पाहिली. यामुळे न्यायालयातील युक्तिवाद, शिस्त आणि कामकाजाची पद्धत यांचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना मिळाला. यामुळे त्यांच्या सैद्धांतिक ज्ञानाला व्यावहारिकतेची जोड मिळाली.

विद्यार्थ्यांनी न्यायालयातील जजेस लायब्ररी (Judges' Library), संग्रहालय (Museum) तसेच इतर न्यायालयीन कक्षांना भेट दिली. विशेष म्हणजे, न्यायालय कक्ष क्रमांक ४६ येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या ऐतिहासिक खटल्याची सुनावणी झाली होती. या ऐतिहासिक ठिकाणाला भेट देताना विद्यार्थ्यांनी विशेष अभिमान आणि उत्साह व्यक्त केला.

या भेटीचे एक विशेष आकर्षण म्हणजे लोकमान्य टिळक यांच्या खटल्याशी संबंधित न्यायालयीन कक्ष होय. हा कक्ष भारताच्या कायदेशीर आणि स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील एक महत्त्वाचा साक्षीदार असल्याने विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दल आदर आणि अभिमानाची भावना निर्माण झाली.

विद्यार्थ्यांनी उच्च न्यायालयाच्या संग्रहालयाला भेट दिली. तेथील कर्मचाऱ्यांनी न्यायालयाचा इतिहास, स्थापना आणि विकास याविषयी सविस्तर माहिती दिली.



## उरणमधील कोप्रोली आणि पाणदिवे गावात डेंग्यूची साथ

**उरण : बातमीदार, प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील कोप्रोली, पाणदिवें गावात डेंग्यूची साथ मोठ्या झपाट्याने पसरत आहे . गावात २५ ते ३० पेशंट सापडले आहेत. अजूनही ही संख्या वाढतच आहे अशा परिस्थितीत आरोग्य केंद्रामार्फत फक्त नॉर्मल पहाणी व फवारणी केली आहे, पण डेंग्यूची साथ नियंत्रणात आणण्यासाठी कोणतीही ठोस उपाय योजना नसल्याने पेशंट वाढतच आहेत.

**उपाययोजना करण्याची मागणी**

स्थानिक ग्रामस्थांच्या मते, अनेक वेळा कोप्रोली आरोग्य केंद्रात डॉक्टर हजर नसतात. त्यामुळे लहानसहान आजारांसाठीही रुग्णांना उरण किंवा पनवेल येथील मोठ्या रुग्णालयात जावे लागते. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, गर्भवती महिला आणि लहान मुलांना याचा अधिक त्रास सहन करावा लागत आहे. दरम्यान, नागरिकांनी संबंधित आरोग्य विभागाने तातडीने लक्ष देऊन डॉक्टर व कर्मचारी उपलब्ध करून द्यावेत, तसेच आवश्यक औषधे व सुविधा तत्काळ उपलब्ध कराव्यात, डेंग्यूची साथ नियंत्रणात आणण्यासाठी प्रशासनाने तात्काळ ठोस भूमिका घ्यावी अशी मागणी केली आहे.

या प्रकरणी आरोग्य विभागाने लवकरात लवकर योग्य ती कारवाई करणे गरजेचे असून, अन्यथा नागरिकांकडून तीव्र आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थ मंडळ पाणदिवे यांच्यामार्फत देण्यात आला आहे.

जिथे जिथे डेंग्यूचे रुग्ण आढळून आले आहे त्या परिसरात जनजागृती करण्यात येत आहे. ज्यांना डेंग्यूची लागण झाली अशा रुग्णांचे रक्ताचे नमुने अलिबागला पाठविण्यात आले आहेत. तसेच कोप्रोली व पाणदिवे गावात व परिसरात सर्वे करण्यासाठी कर्मचारी सुद्धा कार्यरत आहेत. आम्ही सध्या या सर्व घडामोडीवर लक्ष ठेवून आहोत. लोकांनी अनेक दिवस कंटेनर, मोठे बॅरल, टाकी मध्ये पाणी साठवून ठेवल्याने डेंगूचे रुग्ण आढळून आले आहेत. त्यामुळे जनतेला सूचना तसेच आवाहन करण्यात आले आहे की त्यांनी वापरायचे पाणी ८ ते १२ दिवस तसेच न ठेवता पाणी सतत बदलत राहावे. कोणाला कोणतेही समस्या आढळून आल्यास आरोग्य यंत्रणाशी संपर्क साधावा, असे उरण तालुका आरोग्य अधिकारी डॉ. वंदनकुमार पाटील यांनी सांगितले.

## संपादकीय

# महामुंबईत मेट्रोचे जाळे

मुंबईची ओळख म्हणजे वेग, धडपड आणि अखंड धावणारे जीवन. या जीवनशैलीला गती देणारी मुंबई लोकल ही अनेक दशकांपासून शहराची जीवनवाहिनी राहिली आहे, मात्र वाढती लोकसंख्या, वाहनांची प्रचंड वाढ आणि सतत वाढणारी वाहतूक कोंडी यामुळे पर्यायी आणि आधुनिक वाहतूक व्यवस्थेची गरज प्रकर्षाने जाणवू लागली. याच पार्श्वभूमीवर मुंबई मेट्रो ही केवळ पूरक नव्हे, तर अत्यावश्यक अशी वाहतूक व्यवस्था बनत आहे.

**गेल्या दीड ते दोन वर्षांत मुंबईतील मेट्रो प्रकल्पांचा वेग लक्षणीयरीत्या वाढलेला दिसून येतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मेट्रो ९च्या दहिसर ते काशिगाव या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन मंगळवारी करण्यात आले. सन २०१८मध्ये भूमिपूजन झालेल्या या प्रकल्पाने अखेर प्रत्यक्षात येत मिरा-भाईंदर आणि मुंबई यामधील अंतर केवळ भौगोलिक न राहता वेळेच्या दृष्टीनेही कमी करण्याचा मार्ग मोकळा केला आहे. मुंबई महानगर क्षेत्र हे देशातील सर्वात मोठ्या शहरी समूहांपैकी एक आहे. मुंबई, ठाणे, मिरा-भाईंदर, नवी मुंबई, पनवेल अशा अनेक शहरांचा यात समावेश होतो. या सर्व भागांमधील प्रवास सुरळीत करण्यासाठी मेट्रोचे विस्तारित जाळे उभे राहत आहे. मेट्रो ९च्या माध्यमातून ठाणे जिल्ह्यातील पहिली मेट्रो सेवा सुरू होणे ही या दृष्टीने महत्त्वाची पायरी ठरली आहे. याशिवाय मेट्रो २बी (मंडाळे ते डायमंड गार्डन) हा टप्पाही कार्यान्वित करण्यात आला आहे. या मार्गामुळे पूर्व-पश्चिम कनेक्टिव्हिटी सुधारण्यास मोठी मदत होणार आहे. आजवर मुंबईत प्रवास करताना लोकांना उत्तर-दक्षिण दिशेने तुलनेने सुलभ प्रवास करता येत होता, मात्र पूर्व-पश्चिम जोडणी ही मोठी समस्या होती. मेट्रोमुळे हा अडथळा दूर होत आहे. मुंबईतील वाहतूक कोंडी ही केवळ त्रासदायक बाब नसून ती आर्थिक आणि पर्यावरणीय नुकसान करणारी समस्या आहे. दररोज लाखो तास वाहतूक कोंडीत वाया जातात, इंधनाची नासाडी होते आणि प्रदूषण वाढते. मेट्रो ही यावर प्रभावी उपाय म्हणून समोर आली आहे. मेट्रोच्या माध्यमातून प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होतो. वाहतुकीवरील ताण कमी होतो. पर्यावरणपूरक प्रवासाला चालना मिळते. नागरिकांचा ताण आणि थकवा कमी होतो. विशेष म्हणजे मेट्रो ही विद्युत ऊर्जेवर चालणारी व्यवस्था असल्यामुळे ती कार्बन उत्सर्जन कमी करण्यातही मदत करते. त्यामुळे भविष्यातील शाश्वत शहरनिर्मितीसाठी मेट्रो महत्त्वाची भूमिका बजावते. मुंबईचा विस्तार आता केवळ शहरापुरता मर्यादित राहिलेला नाही. नवी मुंबई, पनवेल, कल्याण-डोंबिवली, भिवंडी अशा भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर लोकवस्ती वाढत आहे. या सर्व भागांना मुख्य मुंबईशी जोडण्यासाठी मेट्रो प्रकल्प राबवले जात आहेत. विशेषतः नवी मुंबई आणि पनवेलपर्यंत मेट्रोचा विस्तार हा भविष्यातील दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. यामुळे या भागांतील रहिवाशांना रोजगार, शिक्षण आणि इतर सुविधा सहज उपलब्ध होणार आहेत. परिणामी, मुंबईवरील लोकसंख्येचा ताणही काही प्रमाणात कमी होईल. मेट्रो प्रकल्पांचा परिणाम केवळ वाहतुकीपुरता मर्यादित राहत नाही. त्याचे दूरगामी आर्थिक आणि सामाजिक परिणामही दिसून येतात. मेट्रो स्थानकांच्या आसपासच्या भागांमध्ये रिअल इस्टेटची किंमत वाढते. नवीन व्यवसाय आणि रोजगाराच्या संधी निर्माण होतात. शहरातील विकास अधिक संतुलित होतो. नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा होते. मेट्रोमुळे शहराचा 'डेव्हलपमेंट पॅटर्न' बदलतो. ज्या भागांकडे पूर्वी दुर्लक्ष होत होते, ते आता विकासाच्या मुख्य प्रवाहात येत आहेत.**

# देवगंधर्व पं. भास्करबुवा बखले



एक अष्टपैलू, चतुरस्त्र प्रतिभेचे श्रेष्ठ गायक कलावंत; गायनाचार्य व अभिजात नाट्यसंगीताच्या परंपरेचे प्रवर्तक. भास्करबुवा बखले यांचा जन्म १७ ऑक्टोबर १८६९ रोजी बडोदे संस्थानातील कठोर या गावी झाला. घरची गरिबी असल्याने प्राथमिक शालेय शिक्षण व त्यानंतर संस्कृत पाठशाळेतले शिक्षण त्यांना फार कष्टाने करावे लागले, पण त्यांनी नाव कमावले. आज त्यांची पुण्यतिथी. त्यानिमित्ताने घेतलेला आढावा...

भास्करबुवांचा आवाज लहानपणापासून गोड असल्यामुळे वर्गशिक्षक त्यांना वारंवार संस्कृत श्लोकपठण करायला लावीत. त्यांच्या या गुणांमुळे पिंगळेबुवा नावाच्या हरिदासाकडे त्यांची संगीत शिक्षणाची सोय झाली. भास्करबुवांच्या आवाजाची कीर्ती पुढे किर्लोस्कर संगीत नाटक मंडळीतील भाऊराव कोल्हटकर यांच्या कानी गेली आणि त्यांनी भास्करबुवांना मंडळींत आणले. मंडळीचा मुक्काम इंदूरला असताना भास्करबुवांचा आवाज

सुप्रसिध्द बीनकार उस्ताद बंदे अलीखाँ यांनी ऐकला आणि स्वतः होऊन त्यांनी भास्करबुवांना संगीतशिक्षणासाठी गंडा बांधला. किर्लोस्कर नाटक मंडळीच्या रामराज्यवियोग या नाटकात त्यांनी मंथरेची, तर संगीतसौभद्र या नाटकात नारदाची भूमिका केली.

सुमारे दोन वर्षे भास्करबुवांनी किर्लोस्कर नाटक मंडळीमध्ये काम केले (साधारणतः सप्टेंबर १८८४ ते ऑक्टोबर १८८६). त्यांचा आवाज फुटल्यामुळे त्यांनी ही नाटक मंडळी सोडली. उच्च दर्जाची गायनकला शिकण्यासाठी ते पुन्हा बडोद्यास आले आणि ग्वाल्हेर घराण्याचे गायक उस्ताद फैजमहंमदखाँ यांचे त्यांनी शिष्यत्व पतकरले. चिकाटीने, मेहनतीने व निष्ठेने त्यांनी खाँसाहेबांकडून विद्या प्राप्त केली आणि खानदानी गवयी म्हणून लौकीक प्राप्त केला. त्यांनी गायलेली नाथ हा माझा, मम आत्मा गमला ही नाट्यपदे खूप गाजली.

उस्ताद फैजमहंमदखाँकडून संगीताचे शिक्षण घेतल्यानंतर त्यांच्याच मार्गदर्शनावरून भास्करबुवांनी आग्रा घराण्याचे उस्ताद नथ्थनखाँ आग्रेवाले यांचा गंडा बांधला. त्यांच्याच सूचनेनुसार त्यांच्या मृत्यूनंतर, भास्करबुवांनी जयपूर घराण्याचे उस्ताद अल्लादियाखाँ यांना गुरू केले आणि त्यांच्या गायकीचे मर्महो आत्मसात केले.

भास्करबुवांनी ग्वाल्हेर, आग्रा व जयपूर या तीनही घराण्यांच्या गायकीचे सौंदर्य आत्मसात केले होते. चीजेची मांडणी व रागाचे स्वरूप स्पष्टपणे व्यक्त करणारे जिवंत स्वरालाप हे ग्वाल्हेरचे वैशिष्ट्य; तर भावपूर्ण शब्दोचार व लयबद्ध बोलाची मांडणी हे आग्रा घराण्याचे वैशिष्ट्ये आणि लययुक्त, डौल साधणाऱ्या वैचित्र्यपूर्ण तानांच्या आकृती निर्माण करणारे जयपूर घराण्याच्या गायकीचे वैशिष्ट्य असा त्रिवेणी संगम त्यांच्या गायकीत झाला होता.

ख्याल, ठुमरी, नाट्यसंगीत, सुगम संगीत इत्यादी संगीताचे प्रकार सारख्याच प्रभुत्वाने आणि ढंगदारपणे गाणारे ते कलावंत होते. शास्त्रीय संगीतावर आधारित चिजांच्या चाली वापरून त्यांनी नाट्यगीते संगीतबद्ध केली. सौंदर्ययुक्त आणि समतोल गायकीचा उच्च आदर्श त्यांनी संगीत जगतात निर्माण केला. प्रसन्न व्यक्तिमत्त्व, सौंदर्यपूर्ण गायकी आणि प्रेमळ व दिलदार स्वभाव या तीनही गुणांमुळे भास्करबुवांची ख्याती हिंदुस्थानात सर्वत्र पसरली आणि कलाक्षेत्रात त्यांना सर्वसामान्यता लाभली.

भास्करबुवांनी विद्यादानही मुक्तपणे केले. आरंभी किर्लोस्कर आणि नंतर गंधर्व नाटक मंडळीचे ते संगीत गुरू होते. विद्याहरण, स्वयंवर, द्रौपदी यांसारख्या संगीतनाटकांना संगीत देऊन तसेच बालगंधर्व, मास्तर कृष्णराव, गोविंदराव टेंबे यांच्यासारख्या समर्थ कलावंतांना तालीम आणि मार्गदर्शन देऊन मराठी नाट्यसंगीताचे दर्जेदार स्वरूप त्यांनी घडविले व नाट्यसंगीतात सौंदर्ययुक्त व भरीव अशी कामगिरी केली. नाट्यसंगीत त्यांनी अभिजात संगीताच्या पातळीवर नेऊन ठेवले. त्यांनीच घडविलेले हे नाट्यसंगीताचे स्वरूप आजही कमी अधिक फरकाने कायम असल्यामुळे त्यांना नाट्यसंगीताचे 'कुलस्वामी' म्हणून संबोधता येईल. मास्तर कृष्णराव, बालगंधर्व, बागलकोटकर, पाटणकरबुवा बापूराव केतकर वगैरे त्यांची शिष्यमंडळी विख्यात होती. गोविंदराव टेबें, र. कृ. फडके, केशवराव भोळे वगैरे कलावंत त्यांना गुरुस्थानी मानीत असत. रसिकांनी त्यांना 'देवगंधर्व' ही मानाची पदवी दिली.

भास्करबुवांनी धारवाड येथील ट्रेनिंग कॉलेजात काही काळ संगीत शिक्षक म्हणून नोकरीही केली (१९०६-०८). त्यांनी पुणे येथे 'भारत गायन समाज' या संस्थेची स्थापना केली (१९११). भास्करबुवांचे पुणे येथे ८ एप्रिल १९२२ रोजी निधन झाले. 'भारत गायन समाज' ही संस्था दरवर्षी त्यांच्या स्मरणार्थ 'देवगंधर्व संगीत महोत्सवाचे' आयोजन करते.

**-सुधीर पोटे**
**(मराठी विश्वकोष)**

# वंदे मातरम् राष्ट्रीय गीताचे कवी बंकिमचंद्र चटर्जी

भारताचे 'अलेक्झांडर ड्यूमा' म्हणून ओळखले जाणारे बंकिमचंद्र चटर्जी सुरवातीपासूनच एक हुशार विध्यार्थी होते. लहान पणापासूनच त्यांचे मन लिहण्या वाचण्यात रमत असे. अशी महान बुद्धि असणारे बंकिमचंद्र चटर्जी यांनी आपल्या शालेय जीवनातच एक कविता लिहून आपल्या लिखाणातून सर्वाना अचंबित करून टाकल होतं.त्यांचा जन्म

२७ जुन १८३८ रोजी झाला .त्यांना संस्कृत भाषे प्रती खूपच आकर्षण होत. शिक्षणा बरोबरच खेळामध्येही त्यांची खूप आवड होती. शाळेतील प्रत्येक कार्यक्रमात ते मोठ्या उत्साहाने सहभाग घेत असतं. आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्या नंतर बंकिमचंद्र चटर्जी यांनी आपले पुढील शिक्षण "मोहसीन" महाविद्यालयात पूर्ण केले.

सन १८५७ च्या पूर्वी स्वातंत्र्य आंदोलनाच्या वेळेला "कलकत्ता विद्यापीठातून" पदवी ग्रहण करणारे ते पहिले भारतीय नागरिक आहेत. यानंतर त्यांनी आपले वकिलीचे शिक्षण पूर्ण केलं.बंकिमचंद्र चटर्जी यांनी आपले शिक्षण पूर्ण केल्यानंतर ब्रिटीश शासनाच्या राजवटीत सरकारी सेवेत दंडाधिकारी(मजिस्ट्रेट) म्हणून रुजू झाले. दंडाधिकारी म्हणून बंकिमचंद्र चटर्जी यांनी ब्रिटीश शासनाच्या राजवटीतील सरकारमध्ये जवळपास ३० वर्ष सेवा दिली. एकोणिसाव्या शतकात बंकिमचंद्र चटर्जी यांनी बंगाली साहित्याला एक नवीन दिशा दिली होती. त्यांच्या मुळेच बंगाली साहित्याला भरपूर प्रसिद्धी



मिळाली होती. यानंतर त्यांनी आपल्या क्षेत्रातील बंगाली भाषेत साहित्य लिहायला सुरवातच नाही केली तर, त्या साहित्याला नव्या पातळीवर आणण्यात महत्वाची भूमिका देखील बजावली. बंकिमचंद्र चटर्जी यांची प्रेम कथेवर आधारित बंगाली भाषेतील पहिली कादंबरी 'दुर्गेशनंदिनी' सन १८६५ साली प्रकाशित झाली होती. तसचं, सन १८६६ साली त्यांच्याद्वारे लिहिण्यात आलेल्या कपालकुंडला रचनेची मोठया प्रमाणात प्रशंसा करण्यात आली होती.

याव्यतिरिक्त, सन १८७३ साली त्यांनी विषवृक्ष, सन १८७७ साली 'चंद्रशेखर', सन १८८१ साली राजसिंग, सन १८८२ साली त्यांनी "आनंदमठ" कादंबरी लिहिली होती. बंकिमचंद्र चटर्जी यांनी लिहिलेल्या "आनंदमठ" नावाच्या कादंबरी मधून भारताचे प्रसिद्ध राष्ट्रगीत "वंदेमातरम्" घेण्यात आले आहे.

या गीताची लोकप्रियता इतकी होती की या गीताचे गायन स्वतः गुरुदेव रवीन्द्रनाथ टागोर यांनी केलं होतं. याशिवाय बंकिमचंद्र चटर्जी यांनी देवी चौधराणी, "सीताराम", 'कमला कांतेर दप्तर', 'कृष्ण कांतेर विल', 'विज्ञान रहस्य', 'लोकरहस्य', 'धर्मतत्व' अश्या प्रकारच्या अनेक ग्रंथाची त्यांनी रचना केली होती. वंदे मातरम् या राष्ट्रगीताचे कवी, निबंधकार, कादंबरीकार, तत्त्वज्ञ, भाषाशास्त्रज्ञ, धर्ममिमांसक आणि सुधारक बंकिमचंद्र यादावचंद्र चटर्जी यांचे ८ एप्रिल १८९४ रोजी निधन झाले

(साभार : इंटरनेट)

## बदलते तंत्रज्ञान

### ट्रायम्फ ट्रॅकर ४०० भारतात झाली लॉन्च

ब्रिटिश प्रीमियम बाईक निर्माता कंपनी ट्रायम्फने सोमवार (६ एप्रिल) भारतात आपली नवीन मोटरसायकल ट्रॅकर ४०० लाँच केली आहे. कंपनीने ही बाईक खास भारतीय बाजारातील कर धोरणे लक्षात घेऊन तयार केली आहे.यात जुने ३९८cc चे इंजिन न देता ४०hp पॉवर असलेले एक अगदी नवीन डाउनसाईज्ड ३४९cc चे इंजिन देण्यात आले आहे. याची एक्स-शोरूम किंमत ₹२,४६,००० आहे.




डिझाइन आणि लूकः फ्लॅट-ट्रॅक रेसिंगने प्रेरित आहे स्टाइल-डिझाइनच्या बाबतीत ट्रायम्फ ट्रॅकर ४०० इतर मॉडेल्सपेक्षा खूप वेगळी दिसते. याला 'फ्लॅट-ट्रॅक' प्रेरित रोड बाईक म्हणून डिझाइन केले आहे.

बॉडीवर्कः यात बॉक्ससारखी दिसणारी इंधन टाकी, लहान फ्लाईस्क्रीन आणि नंबर-बोर्ड स्टाईलचे साइड पॅनेल दिले आहेत.रिअर लुकः बाईकचा मागील भाग बऱ्याच अंशी थ्रक्सटन ४०० सारखा आहे, ज्यात आयताकृती LED टेल-लाइट आणि कलर-कोडेड सीट काउल (Cowl) मिळते.

रंग पर्यायः कंपनीने हे तीन व्हायब्रंट कलर कॉम्बिनेशनमध्ये सादर केले आहे- पांढऱ्यासोबत लाल, पिवळ्यासोबत काळा आणि काळ्यासोबत लाल.हार्डवेअर आणि टायरः १७-इंचचे नवीन अलॉय व्हील्स

ट्रॅकर ४०० चे वजन १८१ किलो आहे, जे नवीन स्पीड ४०० पेक्षा सुमारे २ किलो जास्त आहे. रायडिंग आरामदायक बनवण्यासाठी यात प्रीमियम हार्डवेअर वापरले आहे.

सस्पेन्शनः समोर अपसाइड-डाउन (USD) फोर्क्स आणि मागे मोनोशॉक सस्पेन्शन सेटअप देण्यात आले आहे.

टायर्सः बाईकमध्ये १७-इंचचे नवीन डिझाइन असलेले अलॉय व्हील्स मिळतात. पकडीसाठी यात MRF REVZ FD१ टायर्सचा वापर करण्यात आला आहे.

ब्रेकिंगः सुरक्षेसाठी यात दोन्ही चाकांवर डिस्क ब्रेकसह ड्युअल-चॅनल ABS मिळण्याची अपेक्षा आहे.

इंजिन आणि परफॉर्मन्सः कमी डिस्प्लेसमेंट असूनही पॉवरमध्ये कमतरता नाही गिअरबॉक्सः यात स्मूथ शिफ्टिंगसाठी ६-स्पीड गिअरबॉक्स देण्यात आला आहे.

ट्यूनिंगः याला थ्रक्सटन ४०० प्रमाणे हाय स्टेट ऑफ ट्यूनमध्ये ठेवण्यात आले आहे,

# महान क्रांतिकारक मंगल पांडे



## निमित्त

भारतीय इतिहासात अनेक महान क्रांतिकारकांचा जन्म झाला, ज्यांनी भारताला स्वतंत्र करण्यासाठी आपल्या प्राणाचे बलिदान दिले. मंगल पांडे हे भारताचे पहिले स्वातंत्र्यसैनिक म्हणून जगभर प्रसिद्ध आहेत. त्यांनी सर्वप्रथम इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. त्यांचे स्वातंत्र्यसैनिक होण्याचे उद्दिष्ट फक्त आणि फक्त भारतातील निष्पाप जनतेची ब्रिटीश राजवटीतून सुटका करणे हेच होते.

मंगल पांडे यांनी सुरू केलेला हा स्वातंत्र्यलढा थांबवण्यासाठी इंग्रजांनी खूप प्रयत्न केले, पण त्यांना पाहून संपूर्ण भारतातील नागरिकांच्या मनात ब्रिटीश राजवटीविरुद्ध क्रांतिकारकाची भावना जागृत झाली.मंगल पांडे यांच्या स्वातंत्र्यलढ्याच्या सुरुवातीपासून असे अनेक शूर क्रांतिकारक भारतात जन्माला आले, ज्यांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली आणि १९व्या शतकाच्या मध्यापर्यंत भारत इंग्रजांच्या तावडीतून मुक्त झाले.


भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी लढणाऱ्या स्वातंत्र्यवीर मंगल पांडे यांचा जन्म बिहारमधील बलिया जिल्ह्यातील नगवा नावाच्या गावात झाला. सध्या हे ठिकाण उत्तर प्रदेशातील ललितपूरजवळ आहे. मंगल पांडे यांचा जन्म १९ जुलै १८२७ रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव दिवाकर पांडे होते, तर आईचे नाव अभय राणी होते.

मंगल पांडे सुरुवातीच्या आयुष्यात ईस्ट इंडिया आर्मीमध्ये सामील झाले होते. त्यांना ईस्ट इंडिया कंपनीच्या सैन्यात पायदळात शिपाई करण्यात आले. ते ब्रिटीश राजवटीत सैन्यात भरती झाल्यावर भारतात नवीन प्रकारची रायफल सुरू झाली. ज्या वेळी ही रायफल लाँच करण्यात आली, त्या वेळी तिचे नाव एनफिल्ड रायफल असे होते. या रायफलमधील ग्रीस प्राण्यांच्या चरबीपासून बनवल्याचे वृत्त पसरले आणि मंगल पांडे हे प्राणी गायी आणि डुक्कर असल्याचे कळताच भयंकर संतापले.

या रायफलमधील वंगण तोंडातून काढून टाकावे लागले, अशा प्रकारे हिंदू-मुस्लिम धमियांच्या धार्मिक श्रद्धांशी खेळल्याने मंगल पांडे यांना खूप राग आला आणि त्याने इंग्रजांचा बदला घेण्याचा विचार केला.रायफलच्या ग्रीसमध्ये प्राण्यांच्या चरबीचे काडतूस वापरल्याच्या निषेधार्थ मंगल पांडे यांनी २९ मार्च १८७५ रोजी एका ब्रिटिश अधिकाऱ्याला गोळ्या घालून ठार केले. यानंतर स्वतःवर गोळी मारण्याचा प्रयत्न केला, कारण त्यांना कोणत्याही ब्रिटीश शासकाच्या हातून आपला जीव द्यायचा नव्हता, पण ते ब्रिटिशांच्या हाती पकडले गेले.

या घटनेसाठी मंगल पांडे यांना तुरुंगात टाकण्यात आले होते, जिथे त्यांना बरे होण्यासाठी जवळपास एक आठवडा लागला. असे म्हटले जाते की मंगल पांडे यांना कोणत्याही प्रकारचे औषध दिले गेले नाही, कारण त्यांनी एका ब्रिटीश अधिकाऱ्याची हत्या केली होती आणि त्यासाठी त्यांना शिक्षा दिली होती. कोर्टाच्या निर्णयानंतर त्यांना १८ एप्रिल १७५७ रोजी फाशी देण्यात यावी, असा आदेश कोर्टाने दिला होता, परंतु मंगल पांडे यांना ८ एप्रिल रोजी फाशी दिली गेली. सन्मानांतर्गत एक टपाल तिकीट काढण्यात आले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### दररोज ४० मिनिटे कमी बसल्याने शरीरात होईल 'हा' बदल!

दररोज नेहमी बसता त्यापेक्षा एक तास कमी वेळ बसल्याने पाठदुखी कमी होण्यास मदत होऊ शकते, असं 'बीएमजे ओपन'मध्ये प्रकाशित झालेल्या २०२४च्या एका अभ्यासात म्हटलंय. थोडक्यात तुम्ही दिवसभरात तुम्ही जेवढा वेळ बसता, त्यापेक्षा फक्त ४० मिनिटे कमी बसण्याची आवश्यकता आहे. सोपं वाटतंय ना? पण असं केल्यावर आपल्या शरीराच्या इतर भागांवर काय परिणाम होतो? जाणून घेऊया



वेदा रिहॅबिलिटेशन अ‍ॅण्ड वेलनेस'चे वेलनेस तज्ज्ञ तुषार बिष्ट म्हणतात की, सतत बसून राहण्याच्या जीवनशैलीमुळे हृदयविकाराचा धोका वाढतो. कारण- खूप वेळ बसल्यामुळे रक्ताभिसरण मंद होते, ज्यामुळे रक्तदाब आणि कोलेस्ट्रॉलचं प्रमाण वाढतं. हालचालीअभावी स्नायू व सांधे कमजोर होतात आणि त्यामुळे हाडांची घनता कमी होते. विशेषतः चुकीच्या पोश्चरमध्ये जास्त वेळ बसल्यास कंबरदुखी सुरू होते आणि कंबरेखालील स्नायू ताणले जातात, असं ते सांगतात.

शारीरिक हालचालींमुळे शरीरात एंडॉर्फिन नावाचं रसायन तयार होते, जे मानसिक आरोग्य सुधारतं. ते असंही म्हणतात की, कमी हालचाल केल्यानं मानसिक समस्यांचं प्रमाण वाढतं. जर आपण सतत निष्क्रिय राहिलो, तर कालांतरानं वजन वाढू शकतं, कारण शरीराची जेव्हा हालचाल होत नाही तेव्हा कमी उष्मांक (कॅलरीज) वापरले जातात.

बिष्ट सांगतात की, फक्त ४० मिनिटांनी बसण्याचा एकंदर वेळ कमी केल्यानं शरीरात रक्ताभिसरण सुधारतं, रक्तदाब कमी होतो आणि हृदयविकाराचा धोका कमी होतो. अ‍ॅक्टिव्ह राहिल्यानं वजन नियंत्रणात ठेवायला मदत होते आणि डायबिटीजसारखे मेटाबॉलिक आजार होण्याचा धोका कमी होतो, असं त्यांनी सांगितलं. ते पुढे म्हणाले की, मन प्रसन्न वाटतं. लक्ष एकाग्र राहतं आणि अर्थातच पाठदुखीही कमी होते.

सक्रिय विश्रांती खूप उपयोगी ठरतात, कारण त्या शरीराला आरामाच्या स्थितीतून बाहेर काढतात आणि मन ताजं करतात. पाच ते सात मिनिटं शांतपणे, चालल्यास लक्ष परत केंद्रित होऊ लागतं आणि अभ्यासांनुसार यामुळे कामाची क्षमता वाढते, असं बिष्ट म्हणाले. ते असंही म्हणाले की, हालचाल असलेल्या इनडोअर गेम्समध्ये भाग घ्यावा, जसं की टेबल टेनिस. ऑफिसमध्ये असे खेळ ठेवले आणि फक्त पाच मिनिटांचा खेळही खेळला तरी त्यामुळे टीमवर्क वाढतं, माणसांमध्ये उत्साह निर्माण होतो,

# माथेरान ई-रिक्षासंदर्भात मुख्यमंत्र्यांना साकडे

## भाजप अध्यक्ष प्रवीण सकपाळ यांनी दिले निवेदन

**माथेरान : बातमीदार**

माथेरानमधील हातरीक्षा चालकांची अमानवीय प्रथेमधून मुक्ती करण्याचा ऐतिहासिक निर्णय सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी ६ ऑगस्ट २०२५ रोजी दिला.पुढील सहा महिन्यात सर्व हातरीक्षा चालकांचे पुनर्वसन पर्यावरण पूरक ई-रिक्षाद्वारे करण्याचे आदेश शासनाला दिले, मात्र इतके महिने उलटून देखील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाची अंमलबजावणी झाली नसून हातरीक्षा चालकांना फक्त आश्वासने दिली जात आहेत. माथेरान मधील या गहन प्रश्नासंदर्भात माथेरान भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष तथा



नगरसेवक प्रवीण सकपाळ यांनी थेट राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले असून मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्याची विनंती केली आहे.

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या माथेरान मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पर्यावरण पूरक ई-रिक्षा सुरू झाल्या तसेच ई-रिक्षा वाढविण्यासाठी सनियंत्रण समिती देखील गठीत करण्यात आली, मात्र या ई-रिक्षा वाढविण्यासंदर्भात सनियंत्रण समिती वेळकाढूपणा करीत असून त्यांनी न्यायालयाच्या आदेशाचे पालनदेखील केलेले नाही. ही सनियंत्रण समिती ई-रिक्षा बाबत सकारात्मक काम करीत नसून या समितीच्या कामकाजावर माथेरान शहरातून नाराजी व्यक्त केली जात आहे. त्यामुळे या माथेरान मधील सध्याच्या प्रमुख प्रश्नाबाबत मुख्यमंत्री महोदयांनी या हातरिक्षा चालकांना न्याय मिळवून दयावा तसेच या संदर्भात लवकरच आपल्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करावे, असे निवेदन देण्यात आले आहे.

सनियंत्रण समिती माथेरानमधील अशा प्रमुख प्रश्नांबाबत सकारात्मक नसेल, तर अशी समिती बरखास्त करण्यात यावी अशी मागणी सुद्धा स्थानिक नागरिकांमधून केली जात आहे.

## प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेबाबत आवाहन

**रायगड :** केंद्र शासनामार्फत राबविण्यात येणारी प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना (PMIS) ही देशातील युवकांना उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळवून देणारी अत्यंत महत्त्वपूर्ण योजना आहे.

या योजनेंतर्गत निवड झालेल्या उमेदवारांना देशातील नामांकित कंपन्यांमध्ये उमेदवारांना ६ ते ९ महिन्याकरिता इंटर्नशिप देण्यात येणार असून प्रतिमहा ९००० रुपये एवढे विद्यावेतन अदा करण्यात येणार आहे.


मा-हंगरगेकर मॅडम

अॅड. जी आर कडव

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात.

दि. चौ. अर्ज नं. ३८२/२०२६
नि.नं ८/ड
ने.ता. १८/०६/२०१६

१. श्री. नरेश धनाजी म्हात्रे
वय ६९ वर्षे धंदा शेती
२. कै. मुकुंद धनाजी म्हात्रे यांचे वारस
२/१. श्रीमती सुगंधा मुकुंद म्हात्रे
वय ५८ वर्षे, धंदा गृहिणी
२/२. श्री. संकेत मुकुंद म्हात्रे
वय ४१ वर्षे, धंदा शेती
२/३. श्री. सुनाद मुकुंद म्हात्रे
वय ३९ वर्षे, धंदा शेती
३. श्री. अरुण धनाजी म्हात्रे
वय ५७ वर्षे, धंदा शेती
४. श्री. रविंद्र धनाजी म्हात्रे
वय ५६ वर्षे, धंदा शेती
५. कै. धनवंती धनाजी म्हात्रे
यांचे वारस :
५/१. श्री. स्वप्नील धनाजी म्हात्रे
-वय ३१ वर्षे, धंदा नोकरी
अर्जदार नं. १ ते ५/१ सर्व
रा. जासई ता. उरण जि. रायगड
५/२. सौ. सपना राजेंद्र पाटील
वय ३७ वर्षे, धंदा गृहिणी
रा. दिघोडे ता. उरण जि. रायगड
६. सौ. लक्ष्मी अमृत घरत
वय ५२ वर्षे, धंदा गृहिणी --
रा. जासई ता. उरण जि. रायगड
७. सौ. नर्मदा भरत पाटील
वय ५८ वर्षे धंदा शेती
रा. रांजणपाडा ता. उरण जि. रायगड
— अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस हया जाहीर नोटीशीव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार नं. १ ते ७ यांची आई कै. मुक्ताबाई धनाजी म्हात्रे ही ता. ११/३/२०२५ रोजी मौजे जासई ता. उरण जि. रायगड येथे निधन झाली आहे व वडिल कै. धनाजी हिरु म्हात्रे हे देखील ता. ६/७/२०१४ रोजी मौजे जासई ता. उरण जि. रायगड येथे निधन झाले आहेत.

अर्जदार नं. १ ते ७ यांची आई कै. मुक्ताबाई धनाजी म्हात्रे यांचे नांवे पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टातील स्पे.मु.नं. ३९/२०२२ दाव्यातील आदेशानुसार मिळणारी कोर्ट फीची रक्कम रु. १,५०,०००/- रिफंड घेण्यासाठी अर्जदार नं. १ ते ७ यांना सक्शेसन सर्टिफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे.

तरी अर्जदार हयांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आंत या मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत हरकत न घेतल्यास नामदार कोर्ट योग्य त्यापुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करतील, मुदतीनंतर येणा-या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत.

आज ता.६/४/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

सही/-
क लिपीक

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायधिश व स्तर
पनवेल


# धरमतरजवळ उभ्या ट्रेलरला टेम्पोची धडक ; हेल्पर ठार

**पेण : प्रतिनिधी**

धरमतर चेकपोस्ट पुढे वडखळ - अलिबाग मार्गावर रविवारी पहाटे झालेल्या भीषण अपघातात आयशर टेम्पोतील हेल्परचा जागीच मृत्यू झाला. अलिबागकडून वडखळच्या दिशेने जात असताना उभ्या ट्रेलरला आयशरची मागील बाजूस धडक बसल्याने हा अपघात घडला.

मिळालेल्या माहितीनुसार, ट्रेलर (एमएच ४६ बीएफ ७३१४) हा रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून वाहतुकीस अडथळा होईल अशा अवस्थेत उभा करण्यात आला होता. रविवारी पहाटे पहाटे ३.५० वाजण्याच्या सुमारास आयशर टेम्पो (एमएच ०६ सीपी २२२५) चालक अल्पेश आत्माराम पाटील (वय ३९ वर्षे, व्यवसाय ड्रायव्हर रा. नवेदर बेली पो. कुरुळ, ता. अलिबाग जि. रायगड) हे अलिबागकडून वडखळकडे जात असताना उभ्या ट्रेलरला डाव्या बाजूने धडक बसली.

या अपघातात हेल्पर संदेश कृष्णा तेलगे (वय ३५, रा. फणसापूर, ता. अलिबाग यांचा



जागीच मृत्यू झाला. याप्रकरणी ट्रेलर चालक शिवपुजन बिसेश्वर पासवान (वय-४० रा. नेरळ जि. रायगड) यांच्याविरोधात वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. ३१/२०२६, मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १८४, भारतीय न्याय संहिता २०२३ BNS १०६(१),२८५ १२५(A),१२५(B), प्रमाणे गुन्हा दाखलकरण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव हे करीत आहेत

# पेणमध्ये भाजपचा स्थापना दिन साजरा

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील भारतीय जनता पार्टी कार्यालयासमोर पक्षाचा स्थापना दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात माजी खासदार आणि भाजप जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांच्या उपस्थितीत पंचायत समितीचे नवनिर्वाचित सभापती स्मिता पाटील व उपसभापती संजय डंगर यांच्या हस्ते ध्वजवंदन करून पक्षाचा झेंडा फडकवण्यात आला.

धैर्यशील पाटील यांनी सांगितले की, भारतीय जनता पार्टीची स्थापना ६ एप्रिल १९८० रोजी शेवटच्या घटकाला न्याय मिळवून देण्यासाठी करण्यात आली. ४६ वर्षांच्या कार्यकाळात समाजातील विविध घटकांचा उदय करण्याचे काम भाजपकडून केले गेले आहे. पंतप्रधान मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मह प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाच पक्षाने विकासात्मक कामे राबविली आहे

कार्यक्रमात माजी खासदार धैर्यशील पाटील, जिप सदस्य प्रभाकर म्हात्रे, पंचायत समिती सभापती स्मिता पाटील, उपसभापती संजय डंगर, गटनेते विवेक म्हात्रे, नगरपालिका गटनेते अनिरुद्ध पाटील, वाशी सरपंच संदेश ठाकूर, बाजार समिती सभापती महादेव मानकर, नगरसेवक निळकंठ म्हात्रे, मितेश शहा, रवींद्र म्हात्रे, परशुराम पाटील, सुरेश पाटील, आर बी पाटील, मच्छिंद्र पाटील, राजन पाटील, अमित पेस्टील, प्रशांत पाटील, दिनेश शेलार आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# प्राचार्य डॉ. रवींद्र राठोड महाराष्ट्र गौरव रत्न पुरस्काराने सन्मानित



**माणगाव : रामप्रहर वृत्त**

माणगाव येथील नामदेव सुर्वे लॉ कॉलेजचे प्राचार्य डॉ. अॅड. रवींद्र पांडुरंग राठोड यांना सन २०२६ चा मानाचा 'महाराष्ट्र गौरव रत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आला. पुणे येथे रविवारी (ता. ५) एका दिमाखदार सोहळ्यात त्यांना या पुरस्काराने गौरविण्यात आले.

विद्याराज फाऊंडेशन प्रस्तुत आणि शिवमनी स्टुडिओ आयोजित या सोहळ्यात महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत डॉ. राठोड यांना हा सन्मान देण्यात आला. रायगड जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात, विशेषतः विधी (Law) शिक्षणाच्या प्रसारात आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी केलेले कार्य अत्यंत मोलाचे आहे. त्यांच्या या उत्कृष्ट कार्यामुळे समाजाला नवी दिशा मिळत असून महाराष्ट्राच्या गौरवात भर पडली आहे. त्यामुळेच त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

डॉ. अॅड. रवींद्र राठोड यांनी प्राचार्य म्हणून नामदेव सुर्वे लॉ कॉलेज, माणगाव येथे काम करताना केवळ प्रशासकीय जबाबदारीच नव्हे, तर सामाजिक बांधिलकी देखील जोपासली आहे. त्यांच्या या यशाबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.


वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी

राम प्रहर


## श्रीवर्धन तालुक्यात जिओ मोबाईलची सेवा वारंवार ठप्प

**श्रीवर्धन :** येथील शहरासह संपूर्ण तालुक्यामध्ये जिओ मोबाईलची सेवा वारंवार ठप्प होत असल्याने ग्राहकांमधून मोठ्या प्रमाणावर नाराजी पसरली आहे. आठवड्यातून तीन ते चार वेळा दोन-दोन, तीन-तीन तास जिओची मोबाईल सेवा ठप्प झालेली असते. यामुळे ग्राहकांचे अनेक व्यवहार अडकून पडतात. तर जिओचे नेट वापरणाऱ्यांना देखील आपले कामकाज बंद ठेवावे लागते. श्रीवर्धन तालुक्यात जिओ मोबाईलची सेवा सर्वत्र उपलब्ध असल्याने बहुतांश ग्राहकांनी जिओचे सिमकार्ड घेतलेले आहे. जिओ मोबाईलची ५जी सेवा उपलब्ध असल्यामुळे अनेक नेटकरी जिओ मोबाईलचा वापर करताना दिसून येतात.





**कर्जत : आमदार महेंद्र थोरवे यांचे वाढदिवसानिमित्त भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी अभीष्टचिंतन केले. यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते यशवंतशेठ साबळे, आध्यात्मिक आघाडीचे जिल्हा संयोजक काशिनाथ पारठे, खोपोलीचे उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, युवा नेते मुस्तुफा दुस्ते, विकी पवार आदी उपस्थित होते.**


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification

| Sr. No. | Tender No.EE/400kV R.S. (O&M) Dn/ NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-11/26-27/ Rfx No.7000039514 | Supply of various Tools and Plant at 400 kV Nagothane s/s under 400 kV Nagothane Div. | Rs. 5,29,409.38 /- | 22.04.2026 up to 23.59hrs |

**EMD** Rs. 1% of Estimate cost, **Tender fee** Rs. 500/- + GST. For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** Mitesh Goyal (Dy. EE) Mob No. 9461456635 **Email ID: ee7230@mahatransco.in Note:** All eligible suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**400kV R.S. (O&M) Dn. Nagothane.**



आज़ादी का अमृत महोत्सव

**पीएम श्री केन्द्रीय विद्यालय एन.ए.डी. करंजा**
(शिक्षा मंत्रालय भारत सरकार के अधीन स्वायत्त निकाय)
पता -नौसेना आयुध भंडार, करंजा उरण रायगढ़ महाराष्ट्र-४००७०४
**PM SHRI KENDRIYA VIDYALAYA N.A.D. KARANJA**
An Autonomous Body under Ministry of Education, Govt. of India
Address : Naval Armament Depot, Karanja, Uran, Raigad Maharashtra-**400704**

G20 PM SHRI

दूरभाष/फॅक्स-022-27222132, | ई-मेल/E-Mail : kvkaranja@gmail.com | KV CODE : 1205
CBSE Affiliation.1100017 | Web Site: https://nadkaranja.kvs.ac.in | UDISE : 27241501112

**साक्षात्कार सूचना / Walk-In Interview**

पीएम श्री केंद्रीय विद्यालय एन.ए.डी करंजा में शैक्षिक वर्ष 2026-27 हेतु पूर्ण रूप से संविदा के आधार पर (on Purely Contractual Basis) शैक्षिक एवं अन्य पदों के लिए साक्षात्कार आयोजित किया जा रहा है -

| पद का नाम | न्यूनतम योग्यता | साक्षात्कार दिवस |
|---|---|---|
| **स्नातकोत्तर शिक्षक** (Post Graduate Teachers) **(भौतिक विज्ञान, अर्थशास्त्र, इतिहास, )** | किसी मान्यता प्राप्त विश्वविद्यालय से संबन्धित विषय में ५०% अंकों के साथ स्नातकोत्तर डिग्री (एम.ए/एम.एस.सी/एम.कॉम.) एवं बी.एड डिग्री | **16-04-2026** (गुरुवार) |
| **प्रशिक्षित स्नातक शिक्षक** (Trained Graduate Teacher) **(हिन्दी, संस्कृत, सामाजिक अध्ययन)** | किसी मान्यता प्राप्त विश्वविद्यालय से संबन्धित विषय में ५०% अंकों के साथ स्नातक डिग्री (बी.ए/बी.एस.सी) एवं बी.एड डिग्री) और सी.टी.ई.टी. | |
| **प्रशिक्षक : कला शिक्षक, खेल, प्रशिक्षक, विशेष शिक्षक** Art Education Instructor, Sports Coach, Special Educator. | सम्बंधित विषय में डिग्री / डिप्लोमा | |

**Application form QR Code**

**पंजीकरण समय :** 8:00 AM TO 10:00 AM
**नोट :** साशात्कार हेतु पहले इस वेबसाइट पर पंजीकरण करें https://samvida-sathi.kvs.gov.in/ और अधिक जानकारी हेतु विद्यालय की वेबसाइट देखें। आवेदन प्रपत्र / बायोडाटा फॉर्म विद्यालय की वेबसाइट http://nadkaranja.kvs.ac.in से डाउनलोड कर सकते हैं। साक्षात्कार में भाग लेने वाले अभ्यर्थी को किसी तरह का यात्रा भत्ता नहीं दिया जाएगा। साक्षात्कार के दौरान अपने साथ आधार कार्ड (Original) तीन पासपोर्ट आकार की फोटो, मूल दस्तावेज़ एवं सभी दस्तावेजों की एक एक प्रतिलिपि अवश्य लायें।

प्राचार्य/**Principal**
**पीएम श्री केंन्द्रीय विद्यालय/ PM SHRI Kendriya Vidyalaya**
**एन.ए.डी. करंजा / NAD Karanja**
**उरण जिला-रायगढ (महाराष्ट्र)/ Uran-Dist-Raigad (MH)**

# मैत्री करून ११ जणांना ५० लाखांचा गंडा

**पनवेल : वार्ताहर**



मैत्री आणि विश्वास या दोन शब्दांचा गैरफायदा घेत एका तरुणाने आपल्याच बालपणीच्या मित्रासह अन्य १० जणांना तब्बल ४९ लाख ५४ हजार रुपयांचा गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार खारघरमध्ये उघडकीस आला आहे. शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीवर दरमहा ५ ते ७ टक्के आकर्षक परतावा देण्याचे आमिष दाखवून ही फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. खारघर पोलिसांनी या प्रकरणी सागर रंगनाथ साळुंखे याच्याविरुद्ध फरावणुकीसह अपहाराच्चा गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

या प्रकरणातील तक्रारदार अभिजित जाधव आणि आरोपी सागर साळुंखे हे दोघेही बालपणीचे मित्र असून दोघेही खारघरमध्ये राहण्यास आहेत. कोबिड काळानंतर सागरने पुण्यात जाऊन शेअर मार्केटचे प्रशिक्षण घेतले होते. त्यानंतर त्याने २०२२ मध्ये खारघरमध्ये परत येऊन इन्व्हेस्ट फॉर फ्युचर नावाची कंपनी स्थापन केली होती तसेच या कंपनीचे कार्यालय उत्सव चौकातील शात आर्केड येथे थाटले होते. त्यानंतर सागरने आपल्या मित्रांना त्याचे शेअर मार्केटमधील प्रोफाईल आणि मिळत असलेला नफा दाखवून त्यांचा विश्वास संपादन केला तसेच शेअर मार्केटमधील त्याच्या स्किममध्ये पैसे गुंतवल्यास दरमहा ५ ते ७ टक्के परतावा देण्याचे तसेचा १२ महिन्यांनंतर मुद्दल सुरक्षित परत देण्याचे आमिष दाखवले.

सागर साळुंखे हा बालपणीच्या मित्र असल्याने त्याच्यावर विश्वास ठेवून अभिनीत जाधव याने ऑगस्ट २०२३ पासून त्याच्या स्किममध्ये टप्प्याटप्प्याने पैसे गुंतवण्यास सुरुवात केली. एप्रिल २०२४पर्यंत अभिजीतला नियमित परतावा मिळाला, मात्र त्यानंतर परतावा येणे बंद झाल्याने अभिजीतने पैशांची विचारणा केली असता, सागरने बँक खाते सील झाल्याचे कारण सांगितले.

काही दिवसांनंतर त्याने उडवाउडवीची उत्तरे देण्यास सुरुवात केली. कालांतराने त्याने अभिजीतचा नंबर बनैकलिस्टमध्ये टाकला त्यानंतर त्याने खारघरमधून पलायन केले त्यानंतर अभिजीतने सागरबाबत माहिती काढली असता, त्याने फक्त अभिजीतलाच नाही, तर त्याच्या ओळखीतील इतर १० जणांची ही देखील फसवणूक केल्याचे त्याला समजले. अशा पद्धतीने सागर साळुंखे याने अभिजोतसह एकूण ११ गुंतवणूकदारांची तब्बल ४९ लाख ५४ हजार रुपयांची फसवणूक केल्याचे लक्षात आल्यानंतर या सर्वांनी खारघर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. त्यानुसार खारघर पोलिसांनी आरोपी सागर साळुंखे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे तसेच त्याचा शोध सुरू केला आहे. आपल्याच बालपणीच्या मित्रासह अन्य १० जणांना तब्बल ४९ लाख ५४ हजार रुपयाचा गंडा घातल्याचा धक्कादायक उघडकीस आला आहे.

शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीवर आकर्षक परतावा देण्याचे आमिष दाखवून ही फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. मैत्री आणि विश्वास या दोन शब्दांचा गैरफायदा घेत एका तरुणाने फसवणुकीचा हा कारनामा केला आहे.


# इंस्टाग्रामवरील मैत्री पडली महागात!
## पनवेलच्या तरुणाची १५ लाखांची फसवणूक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

समाजमाध्यमावरील ओळखीचा गैरफायदा घेत एका २१ वर्षीय तरुणाची तब्बल १५ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार पनवेलमध्ये उघडकीस आला आहे. बनावट इंस्टाग्राम आयडीच्या माध्यमातून मैत्री करून आजारपणाचे कारण सांगत पैसे उकळल्याची माहिती समोर आली आहे.

या प्रकरणी पनवेलमध्ये राहणाऱ्या २१ वर्षीय तरुणाने पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. गेल्या वर्षी २० डिसेंबर ते ४ एप्रिल या कालावधीत एका बनावट इंस्टाग्राम आयडीद्वारे तरूणाशी संपर्क साधण्यात आला. संबंधित व्यक्तीने स्वतःला 'साक्षी' नावाची मुलगी असल्याचे भासवून तिच्या वडिलांच्या आजारपणासाठी आणि शस्त्रक्रियेसाठी पैशांची गरज असल्याचे सांगितले. यानंतर मोबाईलवरील व्हॉट्सॲपवरून 'निखील माने' नावाचा व्यक्ती संपर्क साधत होता. त्याने स्वतःची ओळख साक्षीच्या मैत्रिणीचा भाऊ असल्याचे सांगितले.

विश्वास संपादन केल्यानंतर आरोपींनी २१ वर्षीय तरूणाकडून टप्प्याटप्प्याने १४ लाख रुपये रोख आणि एक लाख रुपये गुगल पेच्या माध्यमातून



उकळले. या दरम्यान, ४ एप्रिल रोजी दुपारी पीडित २१ वर्षीय तरूणाला सीवूड परिसरातील मॉलसमोर भेटण्यास बोलावले. तेथे आरोपीने त्याचा मोबाईल हिसकावून घेत आणखी पैशांची मागणी केली. पैसे न दिल्यास बलात्काराचा खोटा गुन्हा दाखल करण्याची तसेच कुटुंबियांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन पोवार यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अभय कदम अधिक तपास करत आहेत. समाजमाध्यमांवरील अनोळखी व्यक्तींशी संबंध ठेवताना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# वाशिवलीत हिंदू राष्ट्र जागृती सभा



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वशिवली गावात हिंदू राष्ट्रजागृती सभा झाली. संस्कृतीक आध्यात्मिक सुशोभीकरण मंडळ, यांच्या वतीने डॉ. पानेरकर महाराज विद्यालय व ज्युनिअर कॉलेज वशिवली, मैदानात ही सभा आयोजित केली होती.

मंडळाच्या वतीने पंचक्रोशीतील ग्रामस्थामध्ये सनातन हिंदू धर्माचे महत्व बिंबवण्यासाठी हिंदू राष्ट्र जागृती सभेचे आयोजन करण्यात आले होते.

हिंदुद्रोह्यांकडून हिंदूविरोधात वेगवेगळ्या प्रकारचा जिहाद छेडला गेला आहे. अनेक हिंदू मुलींना खोट्या प्रेमाच्या जाळ्यात फसवून त्यांचे आयुष्य उध्वस्त करण्याचे षडयंत्र लव्ह जिहादच्या माध्यमातून सुरू आहे. त्यांच्याशी लढण्यासाठी आपल्याला सिद्ध होणे गरजेचे आहे. धर्माचरणामुळे या लढ्यासाठी आपल्यात ईश्वराची शक्ती मिळेल. हिंदूधर्माच्या रक्षणासाठी हिंदूंनी स्वसंरक्षण प्रशिक्षण घेणे अत्यंत आवश्यक आहे. भविष्यात हा देश हिंदुराष्ट्र म्हणून उदयाला येणार आहे. या कार्यात आपणही आपला वाटा उचलायला हवा, असे आवाहन हिंदू जनजागृती समितीचे सुनील कदम यांनी यावेळी उपस्थितांना केले.

यावेळी सनातन संस्थेच्या मोहिनी मांढरे यांनीही उपस्थितांना संबोधित केले.

# लाचखोर व्यवसाय कर अधिकारी लाचलुचपत विभागाच्या जाळ्यात

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईत एका सॉफ्टवेअर व वेबसाईट डेव्हलपमेंट व्यावसायिकता पीटीइसी आणि पीटीआरसी प्रमाणपत्र देण्यासाठी दहा हजाराची लाच मागणाऱ्या व्यवसाय कर अधिकारी लाच लुचपत विभागाच्या जाळ्यात अडकला आहे. त्याच्या सोबत खासगी काम करणाऱ्या महिलेलाही ताब्यात घेण्यात आले आहे. या घटनेने वस्तू आणि सेवा कर विभागात खळबळ उडाली आहे.

व्यवसाय कर अधिकारी अमित गिरी, आणि त्यांच्याकडे काम करणारी खाजगी महिला वैशाली कदम असे यातील संशयित आरोपींची नावे आहेत. यातील तक्रारदार यांचा नवी मुंबईत सॉफ्टवेअर व वेबसाईट डेव्हलपमेंट व्यवसाय आहे. या व्यवसायाच्या अनुषंगाने जीएसटी (वस्तू सेवा कर विभाग कोकण परिक्षेत्र बेलापूर येथून तक्रारदार यांना यातील



व्यवसाय कर अधिकारी अमित गिरी यांची सही असलेली PTEC (व्यावसायिक कर नोंदणी प्रमाणपत्र) आणि PTRC (कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कापलेला व्यवसाय कर) संदर्भात कारणे दाखवा नोटीस ई-मेलद्वारे आली होती.

या नोटीसच्या अनुषंगाने तक्रारदार हे व्यवसाय कर अधिकारी गिरी यांना भेटण्याकरिता त्यांच्या कार्यालयात गेले असता त्यांनी त्यांच्या कार्यालयातील सहाय्यक वैशाली कदम यांना भेटण्यास सांगितले. तेव्हा त्यांच्या कार्यालयातील वैशाली कदम यांनी तक्रारदार यांच्या कागदपत्रांची पडताळणी करून त्यांना २३ हजार ९०० रुपये इतकी रक्कम भरावी लागेल असे सांगितले. त्यातील १२ हजार ९०० रक्कम ची पावती उर्वरित १० हजार रुपये ही फाईल क्लोज करण्यासाठी गिरी यांना द्यावे लागतील असे सांगितले. हीच १० हजारची रक्कम शासकीय फी नसून लाच मागण्यात आली होती. याबाबत तक्रारदार यांनी २ एप्रिलला लाच लुचपत विभागाकडे लेखी तक्रार दिली होती. तक्रारीची दखल घेत त्याची पडताळणी त्याच दिवशी करण्यात आली तसेच अमित गिरी यांच्यासाठी १० हजार ऐवजी ७ हजार देण्याचा तडजोडअंती व्यवहार ठरला.

६ एप्रिलला गिरी यांच्या कार्यालयातच सापळा रचण्यात आला. हा व्यवहार हा सात हजार रुपयात ठरला असला तरीही खाजगी महिला नामे वैशाली कदम यांनी तक्रारदार यांना नोंदणी करून देण्यासाठी नव्याने अतिरिक्त दोन हजार मागितल्या प्रमाणे तिला देण्यात आले. ही रक्कम खासगी महिला वैशाली कदम यांना देण्यासाठी गिरी यांनी मागितली होती असे समोर आले. त्यानंतर गिरी यांनी मागितलेली सात हजार रुपये देण्यासाठी तक्रारदार यांनी त्यांच्या कॅबिन मध्ये स्वीकारताच त्यांना रंगेहात पकडण्यात आले. ही कारवाई सव्वा सहा वाजता पूर्ण करण्यात आली.

गिरी आणि वैशाली कदम यांना ताब्यात घेत त्यांची अंगझडती घेण्यात आली. त्यात दोघांचे मोबाईल लाचेची रक्कम जप्त करण्यात आली. तसेच दोघांच्याही घराची झडती काम अद्याप सुरु आहे. हि कारवाई लाच लुचपत विभागाचे पोलीस उपअधीक्षक धर्मराज सोनके यांच्या नेतृत्वाखाली पार पडली असून पोलीस निरीक्षक अरुंधती येळवे या गुन्ह्याचा तपास करीत आहेत.

# जुईनगर येथे भाजप स्थापना दिन साजरा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी ,नवी मुंबई जिल्हा यांच्या वतीने भाजपा नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाच्या स्थापना दिनानिमित्त जुईनगर येथील पक्ष कार्यालयात पक्षाच्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले .

यावेळी माजी नगरसेवक काशिनाथ पाटील, नगरसेविका डॉ.प्रणाली पाटील आदींच्या उपस्थितीत भाजपा कार्यकर्त्यांना मिठाई भरवत स्थापना दिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हाध्यक्ष डॉ.राजेश ज.पाटील, भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भारतीय जनता पक्षाला ४६वर्षे पूर्ण झाली आहेत. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी आणि पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या विचारांतून सिंचन झालेले हे संघटन, माजी पंतप्रधान अटलजी-अडवाणीजींच्या मेहनतीने बहरले आणि आज पंतप्रधान नरेंद्र मोदीजीं यांच्या नेतृत्वाखाली 'विकसित भारत' घडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहे, असे डॉ. राजेश पाटील यांनी बोलताना सांगितले.



# जागतिक जल दिनानिमित्त मुक्या प्राण्यांसाठी पाणी, खाद्याची व्यवस्था





**उरण : बातमीदार**

शिव प्रतिष्ठान करंजाडे व शिव मावळे यांच्या वतीने जागतिक जल दिवसाचे औचित्य साधून मूठभर धान्य व घोटभर पाणी ही संकल्पना राबविण्यात आली.ज्या प्रमाणे माणसाच्या ३ गरजा आहेत त्याच प्रमाणे पक्षी व प्राण्यांच्या देखील तश्याच प्रकारे गरजा आहेत सध्या उन्ह्याचे दिवस आहेत पक्षांना व मुक्या प्राण्यांना सध्या पाणी व खाऊची गरज आहे ह्याचेच भान ठेऊन शिव प्रतिष्ठान करंजाडे यांच्या वतीने मूठभर धान्य व घोटभर पाणी ही संकल्पना करंजाडे मध्ये मोठ्या उत्साहात राबविण्यात आली.ह्या कार्यक्रमाला शिव प्रतिष्ठान अध्यक्ष सत्यजित पाटील,

सचिव राकेश कुसळे, सुनील अंबावडे, अविनाश ठोसर, सुरेश बारवे, अमर कुसळे, तुषार कदम, योगेश कुलाल, अमर सावंत, रोशन शर्मा आदी उपस्थित होते. ह्या वेळी शिव प्रतिष्ठानच्या वतीने निसर्ग व पर्यावरणचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी सर्वांनी पक्षांसाठी व पाळीव प्राण्यांसाठी अश्या संकल्पना राबविल्या पाहिजेत, असे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे. निसर्ग व सजीव सृष्टी टिकवून ठेवण्यासाठी सर्वांनी एकत्र आले पाहिजेत असा संदेश प्रत्यक्ष कृतीतून सदर संस्थेने सर्वांना दिला आहे.

शिव प्रतिष्ठान करंजाडे व शिव मावळे यांच्या वतीने वर्षभर विविध सामाजिक, पर्यावरणपूरक अनेक उपक्रम राबविले जातात. शिव प्रतिष्ठान करंजाडे व शिव मावळे यांच्या वतीने राबविण्यात आलेल्या मूठभर धान्य व घोटभर पाणी या उपक्रमामुळे मुक्या प्राण्यांना पाणी व अन्न, खाद्य उपलब्ध होणार आहे त्यामुळे उन्हाळा मध्ये मुक्या पशु पक्षी प्राण्यांचे मृत्यूचे प्रमाण कमी होणार आहे.

# गव्हाण-कोपरमधील अखंड हरिनाम सप्ताहाचा समारोप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण-कोपर यांच्या संयुक्त विद्यमाने गव्हाण येथील श्री शांतादेवी मंदिर परिसरात २१ व्या अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण सोहळ्याचे अतिशय उत्साहात आयोजन करण्यात आले होते.

वैकुंठवासी ह.भ.प. अप्पा माऊली (पनवेल) यांच्या कृपाशीर्वादाने आणि ह.भ.प. बानुबाई यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला. ३१ मार्च २०२६ पासून सुरू झालेल्या या सप्ताहात दररोज पहाटे काकडा भजन, सकाळी ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी प्रवचन आणि रात्री नामवंत कीर्तनकारांची कीर्तने अशा विविध आध्यात्मिक



कार्यक्रमांमुळे संपूर्ण परिसरात भक्तीचे वातावरण निर्माण झाले होत. या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणून ६ एप्रिल रोजी सकाळी ग्रंथराज ज्ञानेश्वरी पूजन करण्यात आले, तर सायंकाळी दिंडी सोहळा व दीपोत्सव सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न झाला.

यावेळी पुणे येथील प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. डॉक्टर चारुदत्त महाराज अफळे यांचे कीर्तन पार पडले, ज्याचा लाभ परिसरातील भाविकांनी घेतला. या सप्ताहाची सांगता मंगळवारी ह.भ.प. श्रावण महाराज अहिरे यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली.

# पनवेल महापालिकेची डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त नियोजन बैठक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकसहभागातून महानगरपालिकेतर्फे १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त पनवेल शहरामध्ये भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर महापौर नितीन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि.७) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात नियोजन बैठक घेण्यात आली.

यावेळी मिरवणूक, सांस्कृतिक कार्यक्रम, विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा, सुरक्षाव्यवस्था, स्वच्छता व विविध सुविधा याबाबत नियोजनविषयक चर्चा करण्यात आली. मिरवणुकीसाठी रुग्णवाहिका, थंडपाणी, अल्पोपहार, एनर्जी ड्रिंक, सुरक्षा रक्षक, लाईट व्यवस्था आणि स्वच्छतेची विशेष काळजी घेतली जाणार असल्याची माहिती यावेळी परिवहन व्यवस्थापक गावडे यांनी दिली.

जयंतीच्या दिवशी सकाळी ७ वाजता नागरिकांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळ एकत्र जमून पुष्पहार अर्पण केला जाईल. यावेळी पाठपूजा करून मानवंदना दिली जाईल. यानंतर सकाळी ७.२० वाजता पुतळ्याजवळून भव्य मिरवणुकीला प्रारंभ होईल. मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज चौक, एमटीएनएल. रोड, संत जगनाडे महाराज चौक, रोहिदास वाडा, टपाल नाका, कर्नाळा सर्कल, भाजी मार्केट, कर्मवीर भाऊराव पाटील चौक, विरुपाक्ष मंदिर, निल सॉलिटीयर इमारत, छत्रपती शिवाजी चौक या मार्गे नाट्यगृह येथे पोहचून समाप्त होईल. त्यानंतर नाट्यगृह येथे पुढील कार्यक्रम होईल.

या बैठकीस उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महानगरपालिका सदस्य, अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, प्रसेनजित कारलेकर, स्वरूप खारगे, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीचे प्रास्ताविक परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, आभार उपायुक्त डॉ. वैभव विधाते व सूत्रसंचालन मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर यांनी केले.

ज्या सामाजिक मंडळांना या मिरवणुकीत चित्ररथाच्या माध्यमातून सहभाग घ्यायचा आहे, परंतु केवळ आर्थिक कारणांमुळे शक्य होत नाही त्यांना आमच्या माध्यमातून सहकार्य केले जाईल, असे महापौर नितीन पाटील यांनी यावेळी सांगितले.

# उरणमधून मुलगी बेपत्ता



**उरण : बातमीदार**

उरण पोलीस ठाण्यात एक १५ वर्षीय मुलगी बेपत्ता झाल्याची नोंद करण्यात आली आहे. फिर्यादी कल्पना समीर विजयम बय ४२, धंदा मजुरी, राहतात दि.ब्रा. हॉलचे बाजुला, अमृत म्हात्रे यांचे घर कमांक ३१७ जासई ता. उरण जि. रायगड येथे आहेत.

फिर्यादीने दिलेल्या माहितीनुसार, त्यांची मुलगी स्मिता समीर विजयम (वय १५) घरातून बेपत्ता झाली आहे. ती चार फूट एक इंच उंचीची, बांधा-मजबुत, रंग-गोरा, चेहरा- गोल, केस-काळे लांब, अंगात पांढरा मऊम शर्ट व पायात मस्त रंगाचा सलवार परिधान केलेला असून भाषा-मराठी, हिंदी व इंग्रजी अवगत आहे.

गुन्हा दाखल करण्याचे कारण म्हणजे २ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजताचे सुमारास उरण येथील हॉलचे बाजुला, अमृत म्हात्रे यांचे घर कमांक ३१७ जासई ता. उरण येथून ती बेपत्ता झाली. पोलीस तपास अधिकारी सपोनि राजेश खांडवे, उरण पोलीस ठाणे, नवी मुंबई (९८३४८६४३४४) यांनी तपास सुरू केला आहे. फिर्यादीचे ई-साक्ष नोंदवण्यात आले आहे.

स्मिता समीर विजयम याच्या बेपत्ता होण्याच्या घटनेची सखोल चौकशी सुरू केली असून, तिच्या सुरक्षित परतण्यासाठी सर्व प्रयत्न केले जात आहेत. उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनिफ मुलाणी यांनी या प्रकरणावर लक्ष ठेवले आहे.

# नवी मुंबईत प्रथमच ऑटिझम रन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

जागतिक ऑटिझम जागरूकता दिनानिमित्त, सनशाईन स्कूल वाशीतर्फे आयोजित 'ऑटिझम रन'चे आयोजन नवी मुंबईत प्रथमच करण्यात आले.

या प्रेरणादायी कार्यक्रमाला नवी मुंबई महानगरपालिकेच्या महापौर सुजाता पाटील यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवण्यात आला, यावेळी महानगरपालिकेचे माजी उपायुक्त डॉ. बाबासाहेब राजळे यांचीही सन्माननीय उपस्थिती होती. या अनोख्या उपक्रमाने ऑटिझम स्पेक्ट्रम असलेल्या व्यक्तींना पाठिंबा देण्यासाठी आणि त्यांना ओळख देण्यासाठी नागरिकांना एकत्र आणले, तसेच स्वीकार आणि समावेशनाचा एक सशक्त संदेश दिला.

'लेट्स सेलिब्रेट फिटनेस'तर्फे आयोजित आणि रिचा समित यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या रनने एकता आणि करुणेची खरी भावना दर्शवली. उत्साही सहभाग आणि अर्थपूर्ण सहभागामुळे, या ऐतिहासिक कार्यक्रमाने नवी मुंबईतील जागरूकता उपक्रमांसाठी एक नवीन मापदंड स्थापित केला.



# रोह्यात गर्दीच्या वेळी अवजड, धोकादायक वाहतूक

## ■ नागरिकांच्या जीवाला होतोय मनस्ताप
## ■ पोलिसांनी कारवाई करण्याची मागणी

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा शहरातुन गर्दीच्या वेळीच अवजड व धोकादायक वाहतूक होत आहे. शहराच्या बाहेरून गेलेल्या बायपास रोड वरून ही वाहतूक होत होती. आता तो रस्ता कामामुळे बंद असल्यामुळे ही वाहतूक दमखाडी, नगर परिषद कार्यालय, बस स्थानक, येवले चहा या महत्त्वाच्या वर्दळीच्या मार्गावरून दिवसाढवळ्या सुरू आहे. यामुळे वारंवार वाहतूक कोंडी होत नागरिकांना धोकादायक ठरत आहे. वाहतूक कोंडीची समस्या दूर करत यामुळे कोणतीही अप्रिय घटना घडण्याची वाट न पाहता पोलिसांनी यावर प्रतिबंधत्मक कारवाई करावी, अशी मागणी बाजार पेठेतील व्यापारी, नागरिक करत आहेत. यामुळे दुर्दैवी घटना घडण्याची शक्यता आहे.



रोहा रेल्वे यार्डातुन विळे भागाड येथील पास्को कंपनीला लागणाऱ्या लोखंडी कॉईलची वाहतूक ट्रेलर मधून करण्यात येते. आधीच यामुळे रोहिदास नगर, रेल्वे फाटक, पेट्रोल पंप, अष्टमी नाका, रोहा प्राईड हॉटेल, नवरत्न हॉटेल या ठिकाणी वाहतूक कोंडी होत अपघाताचा धोका निर्माण होत आहे, मात्र आपल्या परिसरात उद्योग यावेत ते वाढावेत, टिकावेत यासाठी रोहे अष्टमीकर नागरिक धोकादायक असूनही हे सर्व सहन करत आहेत. आता बायपास रोड वर एमआय डी सी मार्फत शहरातील पावसाळी पाण्याचा निचरा योग्य प्रकारे होण्यासाठी तेथील एका मोरीचे उंचीकरण व रुंदीकरण काम सुरु आहे. त्यामुळे हा मार्ग सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला आहे.

पर्यायाने आता सर्व वाहतूक नवरत्न हॉटेल, राजमाता जिजाऊ चौक, बस स्थानक, फिरोज टॉकीज या मार्गावर होत आहे. आधीच दिवसेंदिवस वाढती वाहतूक त्यामध्ये आता उन्हाळी सुट्टी हंगाम सुरू असल्यामुळे वाढती पर्यटक वाहने यामुळे या ठिकाणी नेहमीच वाहतूक कोंडी होत आहे. त्यामध्ये पास्को कंपनीची अवजड व धोकादायक वाहतूक सुरु असल्यामुळे नागरिकांना जीव मुठीत घेत मार्ग काढावा लागत आहे. नागरिकांचे सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांनी पास्को कंपनीला त्यांची वाहतूक रात्रीच्या वेळीच करण्याच्या सूचना देणे गरजेचे आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे उप विभागीय अभियंता गिते यांचे कडे याबद्दल विचारणा केली असता होत असलेल्या कामा बद्दल धाटाव वसाहती मधील कारखाने यांना सूचना देत रात्रीच्या वेळी अवजड वाहतूक करण्यासाठी सांगितले आहे.

पास्को कंपनीची वाहतूक होत असल्याबद्दल माहिती नव्हती आता त्यांनाही तसे लेखी कळविण्यात येणार असल्याची माहिती दिली आहे. रोहा पोलिसांनी ही यावर तातडीने लक्ष देत दिवसा होणारी हि वाहतूक बंद करावी, अशी मागणी नागरिकांचे मधून होत आहे.

या संबंधित रोहा रोहा अष्टमी नगर परिषदेने रोहा पोलीस उपविभागीय अधिकारी यांना निवेदन दिले आहे. या निवेदनात रोहा रेल्वे स्टेशन येथे उतरविण्यात येणाऱ्या मेटल कॉइल (Metal Coil) या श्री. मातेश्वरी ट्रान्सपोर्ट, मुन्ना शेठ यांचे मार्फत POSCO या कंपनीला पाठविल्या जात आहेत. सदर मेटल कॉइल (Metal Coil) सारख्या अवजड मालाची वाहतूक शहराच्या मुख्य मार्गावरून कोलाड बाजूस करण्यात येत आहे.

या जड वाहतुकीस रोहा अष्टमी नगर परिषद यांच्याकडून कोणत्याही प्रकारचा परवाना घेण्यात आलेला नाही. या अवजड वाहनांच्या सततच्या वाहतुकीमुळे शहरातील सामान्य नागरिकांच्या दैनंदिन प्रवासास मोठ्या प्रमाणावर अडथळे निर्माण होत आहेत. वाहतूक कोंडी वाढत असून रस्ते अरुंद असल्यामुळे अपघातांची संख्या वाढत आहे. काही नागरिकांना अशा अपघातांमध्ये आपला जीव गमवावा लागल्याची गंभीर बाबदेखील समोर आलेली आहे. त्यामुळे आपण सदर प्रकरणाची तातडीने दखल घेऊन योग्य ती कायदेशीर कारवाई करावी व शहरातील मुख्य मार्गावरून होणाऱ्या अवजड वाहतुकीस तत्काळ मज्जाव करावा, असे निवेदन दिले आहे.

# चौक ग्रामीण रुग्णालयात एचपीव्ही लसीकरण



**चौक : प्रतिनिधी**

गर्भाशय मुखाच्या कॅन्सरपासून मुलींचे संरक्षण करण्यासाठी शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. १४ वर्षावरील मुलींना मोफत एचपीव्ही लसीकरण मोहीम सुरू केली आहे.

खालापूर तालुक्यातील चौक येथील ग्रामीण रुग्णालयांमध्ये ही लस उपलब्ध झाली असून तिचा शुभारंभ वैद्यकीय अधिक्षक डॉ. सविता कालेल यांच्या हस्ते करण्यात आला असूनपालकांनी याचा लाभघ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. सध्या कमी वयातच गर्भाशय मुखाच्या कॅन्सरचे प्रमाण वाढताना दिसत आहे. भविष्यातील धोका टाळण्यासाठी मुलींना वेळेत लस देणे अत्यंत आवश्यक ठरत आहे. यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या आरोग्य विभागाने ही मोहीम राबवली आहे.

बाजारात या लसीची किंमत सुमारे ४५०० रुपये असून, शासनाकडून ती पूर्णपणे मोफत दिली जात आहे. या लसीचे कोणतेही गंभीर दुष्परिणाम नसल्याचेही आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे. ज्या मुलीचे वय १४ वर्षांपेक्षा जास्त असणे आवश्यक आहे, वयाचा दाखला, आधार कार्ड, अपार कार्ड सोबत आणावे. असे आवाहन वैद्यकीय अधिक्षक डॉ. सरला कालेल यांनी केले आहे.

# झोतिरपाडा येथे धार्मिक कार्यक्रम



**पाली : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील झोतिरपाडा–कोळीवाडा येथील श्री क्षेत्र श्री मरुआई येथे श्री मरुआई युवक मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या श्री सत्यनारायण महाराजांच्या महापूजेनिमित्त परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. या धार्मिक सोहळ्यास भाविकांनी उपस्थित राहून दर्शन व पूजेचा लाभ घेतला.

या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या सुश्राव्य किर्तन सेवेत ह.भ.प. श्री रुपेश महाराज शेळके (धाटाव, रोहा) यांनी आपल्या प्रभावी वाणीने उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या किर्तनातून अध्यात्मिक संदेश देत भक्तीची गोडी वाढविण्यात आली. श्री मरुआई युवक मंडळ झोतिरपाडा–कोळीवाडा येथील सुश्राव्य कीर्तनाने भाविक मंत्रमुग्ध झाल्याचे पहावयास मिळाले.

तसेच शिहू विभागीय पंचक्रोशी हरिपाठ सेवेचेही आयोजन करण्यात आले होते. हरिपाठाच्या गजरात परिसर दुमदुमून गेला आणि भाविकांनी भक्तीभावाने सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. उपस्थित भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेत समाधान व्यक्त केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन श्री मरुआई युवक मंडळाच्या कार्यकर्त्यांनी केले होते.

# माणगाव हनुमान मंदिर परिसरात स्वच्छता अभियान

**माणगाव : प्रतिनिधी**

सामाजिक, शैक्षाणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या माणगाव येथील महाआराध्य प्रतिष्ठान फाउंडेशनतर्फे जुने माणगाव येथील हनुमान मंदिर व परिसरात सर्व सदस्यांच्या उपस्थितीत साफसफाई करण्यात आली.

या स्वच्छता अभियान कार्यक्रमास प्रतिष्ठानचे संस्थापक प्रसाद धारिया, संचालिका अंकिता धारिया, सदस्य विक्रांत गांधी, काजल गांधी, योगिता शेठ, विपुल मेथा, चेतन मेथा, प्रवीण बागवे, सुमित पारखे, रोहित, दिनेश शहा, सचिन देसाई, दिनेश शेठ, आराध्य धारिया, परी गांधी, धनुष मेथा आदी उपस्थित होते. यावेळी आराध्य प्रतिष्ठानच्या या सर्व सदस्यांनी मंदिर व मंदिर परिसराची चांगल्याप्रकारे स्वच्छता केली.



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ व सीआयडी यांच्यात करार

**माणगाव : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे आणि भारत सरकारच्या नियोजन आयोगाने स्थापन केलेली राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित संस्था कन्स्ट्रक्शन इंडस्ट्री डेव्हलपमेंट कौन्सिल सीआयडीशी, नवी दिल्ली यांच्यात आज एक अत्यंत महत्त्वपूर्ण सामंजस्य करार संपन्न झाला. नवतंत्रज्ञानाच्या युगात बांधकाम क्षेत्रातील वाढती कौशल्य–दरी भरून काढण्यासाठी आणि व्यावसायिक, युवक व कामगार यांच्यामध्ये दर्जेदार शिक्षण व प्रशिक्षण पोहोचविण्यासाठी हा करार करण्यात आला आहे.



या सामंजस्य करारांतर्गत डीबाटू आणि सीआयडीशी या दोन्ही संस्था संयुक्तपणे अभ्यासक्रम तयार करतील व राबवतील. बांधकाम क्षेत्रातील अद्ययावत तंत्रज्ञान, व्यवस्थापन आणि कौशल्ये यांवर आधारित सर्टिफिकेट कोर्सेस व स्किल ट्रेनिंग प्रोग्राम्स उपलब्ध करून दिले जातील. हे कार्यक्रम प्रत्यक्ष वर्गात शिकविण्याबरोबरच दूरस्थ शिक्षण डिस्टन्स मोड पद्धतीनेही उपलब्ध असतील, त्यामुळे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील विद्यार्थी व कामगारांना याचा लाभ घेता येणार आहे. अभ्यासक्रमाचे मुद्रित, श्राव्य व दृकश्राव्य साहित्य दोन्ही संस्था संयुक्तपणे विकसित करतील, आणि त्यावर दोन्ही संस्थांचा समान बौद्धिक स्वामित्व हक्क जॉईंट कॉपीराईट राहील. परीक्षा, मूल्यमापन व शैक्षणिक अनुपालनाची संपूर्ण जबाबदारी बाटू वर असेल, तर यूजीसी, एआयसीटीइ, केंद्र व राज्य शासन यांच्या सर्व नियामक आवश्यकतांची पूर्तता सीआयडीसी करेल व त्याचे पालन डीबाटू सुनिश्चित करेल.

हा करार दहा वर्षांसाठी लागू राहील. दर पाच वर्षांनी त्याचा आढावा घेऊन आवश्यक ते बदल केले जातील. प्रशिक्षण केंद्रांचे प्रशासन व शिस्त सीआयडी शी सांभाळेल, तर शिक्षक व अन्य शैक्षणिक कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीचे निर्णय परस्पर सहमतीने घेतले जातील.

# कोशिंबळेत हनुमान मंदिर जीर्णोद्धार, प्राणप्रतिष्ठा सोहळा



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील श्री क्षेत्र कोशिंबळे तर्फे तळे येथे ग्रामदैवत भैरी भवानी मातेच्या कृपाशिर्वादाने श्री हनुमान मंदिराच्या जीर्णोद्धार व प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून हा भव्य धार्मिक सोहळा गुरुवार ९ ते ११ एप्रिल २०२६ या तीन दिवसाच्या कालावधीत मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे.

या सोहळ्यामुळे परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांसह भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले आहे.

या सोहळ्याला खासदार व पेट्रोलियम व नैसर्गिक गॅस समितीचे चेअरमन सुनील तटकरे हे खास करून उपस्थित राहणार असून त्यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालकल्याणमंत्री अदिती तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाची शोभा वाढणार आहे. तसेच माणगाव तालुका कुणबी विकास मंडळाचे अध्यक्ष महादेव खेळु बक्कम यांच्या अध्यक्षतेखाली आणि मुंबई मंडळाचे अध्यक्ष महादेव चंद्रकांत बक्कम यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडणार आहे.

या कार्यक्रमाची जोरात तयारी कोशिंबळे ग्रामस्थ मंडळ व महिला मंडळ, मुंबईकर मंडळ कोशिंबळे, संजयदादा मित्र मंडळ कोशिंबळे, जय महाराष्ट्र क्रिकेट संघ कोशिंबळे व्यवस्थापक मंडळांनी केली आहे. या व्यवस्थापक मंडळाकडून या कार्यक्रमासाठी येणाऱ्या सर्व भाविक पाहुण्यांचे तसेच देणगीदारांचे खास आभार मानले असून हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

# कृष्णा कालिका माता मंदिरात अनंत अंबानींचे सपत्नीक पूजन

**कर्जत : प्रतिनिधी**

उद्योगपती मुकेश अंबानी यांचे सुपुत्र अनंत अंबानी यांनी वाढदिवसाच्या पार्श्वभूमीवर कर्जत तालुक्यातील वंजारपाडा, नेरळ येथील कृष्णा कालिका माता मंदिरात पत्नी राधिका अंबानी यांच्यासह पूजा – अर्चा करत धार्मिक वातावरणात दिवसाची सुरुवात केली. यावेळी भरत मेहरा हेही त्यांच्या समवेत उपस्थित होते.

राधा मीरा चॅरिटेबल ट्रस्ट येथे सकाळपासून होमहवन, पूजा, अभिषेक, भजन तसेच गोमाता पूजनाचे आयोजन करण्यात आले होते. अनंत अंबानी यांनी १२ ज्योतिर्लिंग मंदिर, काली माता, दुर्गा माता आणि गणपती पूजन करून विशेष प्रार्थना केली. यानंतर त्यांनी वाढदिवसाचा आनंद आसपासच्या सहा आदिवासी वाड्यांतील नागरिकांसोबत वाटला. पूजनानंतर अनंत अंबानी यांनी गोशाळेलाही भेट देत गायींप्रती आपुलकी व्यक्त केली, तर मंदिर परिसरात उपस्थित स्थानिक नागरिकांशीही त्यांनी मनमोकळा संवाद साधला.



# उन्हाळ्यात कुल्फीची क्रेझ कायम

**रेवदंडा : प्रतिनिधी**

सायकलचा पोंग्यासह कुल्फी.., कुल्फी, असा संमिश्र आवाज नागाव, हटाळे, आक्षी परिसरात गेली पंचवीस वर्ष परिचित आहे. थंडगार कुल्फीने ऐन उन्हाळयांत घश्याला पडलेली कोरड, घालविणारा नागावचा 'बाळुकाका स्पेशल कुल्फीवाला' नागाव मधील लहानथोराचा कुटूंब सदस्य आहे.

तिनचाकी सायकलवर मडक्यात तयारी केलेली दुधाची मलईयुक्त कुल्फी नागाव, आक्षी, हटाळे परिसरातील लहानथोरांची मागणी गेली पंचवीस वर्ष पुरविते, थंडगार कुल्फी मुरूडकडे निघणाऱ्या पर्यटकांना सुध्दा रस्तातच थोपविते. अलिबाग तालुक्यातील नागावच्या मुख्य रस्ताला ऐन उन्हाळयांत घश्याला पडलेली कोरड थंडगार कुल्फीने सलग पंचवीस वर्ष घालवितोय नागावचा प्रसिध्द 'बाळुकाका स्पेशल कुल्फीवाला' पुणे जिल्हांतील सुरेश दामगुंडे यांचे नागाव गावचे वडिलोपार्जित नाते, वडिलांनी पन्नास वर्ष उसाचा रसविक्रीचा धंदा नागाव हटाळे येथे केला, नागावचे ऋणाबंध त्यांनी जपले ते थंडगार कुल्फी विक्रीच्या व्यवसायातून 'बाळुकाका स्पेशल कुल्फीवाला' अशी प्रसिध्द घेत. नागाव, हटाळे, आक्षी मधील छोटया मोठयासह नागावच्या हमरस्तातून प्रवास करणाऱ्या सर्वांनीच 'बाळुकाकाच्या स्पेशल कुल्फीच्या आस्वादाची सवय जडली आहे.

बाळुकाका स्पेशल कुल्फीवाला उर्फ सुरेश दामगुंडे यांचे, वर्षातील दिवाळीनंतर सुरू केलेला कुल्फी विक्रीचा व्यवसाय उन्हाळयांनतर संपतो, पावसाळयांतील सुट्टीचे दिवस पुणे जिल्हांत कुंटूबासह शेती करीत पुनस्यः प्रतिवर्षी बाळुकाका नागावला गेली पंचवीस वर्ष कुल्फी विक्रीला हजर असतो.



# राजिप सदस्य अस्लम राऊत यांचा सत्कार

**माणगाव : प्रतिनिधी**

मोर्बा येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा नवनिर्वाचित रायगड जिल्हा परिषद सदस्य अस्लम इब्राहिम राऊत यांचा मोर्बा सोशल सोसायटी व एस.एस.हायस्कुल जुनिअर कॉलेज मोर्बा यांच्यातर्फे शनिवार, ४ एप्रिल २०२६ रोजी मोर्बा हायस्कुल येथे संस्था पदाधिकारी, सदस्य तसेच मोर्बा एस.एस.हायस्कुल व जुनिअर कॉलेजचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यातर्फे यथोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ.सैफुद्दीन धनसे होते.

त्यांनी आपली ओळख सर्वदूर निर्माण केली असून बहुजन समाजात गरिबांच्या प्रश्नांची जाणीव असणारा नेता म्हणूनही त्यांनी आपली ओळख निर्माण केली आहे. मोर्बा ग्रामपंचायत तसेच रायगड जिल्हा परिषदेत काम केल्याने त्यांच्याकडे प्रशासकीय ज्ञानाचा मोठा अनुभव आहे. ते चौथ्यांदा रायगड जिल्हा परिषदेवर निवडून आल्याने त्यांचा मोर्बा सोशल सोसायटी व एस.एस.हायस्कुलतर्फे यथोचित सत्कार करण्यात आला.



या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष डॉ. सैफुद्दीन धनसे, मोर्बा सरपंच शौकत रोहेकर, सामाजिक कार्यकर्ते अल्ताफ धनसे, मोर्बा धनसे मोहल्ला अध्यक्ष नजीर धनसे, उपाध्यक्ष अब्दुल लतिफ बंदरकर, राऊत मोहल्ला अध्यक्ष मौलाना सरफराज जलगावकर, खालचा मशीद मोहल्ला अध्यक्ष याकुब चिलवान, वरचा मशीद मोहल्ला अध्यक्ष निजाम फोपलूनकर, इब्राहिम धनसे, आसफ पल्लवकर, सलाउद्दीन राउत, हुसेन मुल्ला, सत्तार ढोकले,कादिर हर्णेकर, उपसरपंच झुल्पिकार राऊत, शेख चांद आदींसह संस्थेचे सर्व पदाधिकारी, सदस्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंबर्लेत पालखी सोहळा उत्साहात

### हनुमान जयंतीनिमित्त तीन गावांची एकजूट कायम

**माणगाव : प्रतिनिधी**

सोनभैरी, जोगेश्वरी, सोमजाई, बापुजी आणि हनुमान जयंती उत्सवा निमित्त माणगाव तालुक्यातील अंबर्ले येथे पारंपरिक जत्रा मोठ्या उत्साहात आणि भक्ति भावाने साजरी करण्यात आली.

या उत्सवाचे मुख्य आकर्षण ठरलेल्या गावदेवीच्या पालखी सोहळ्याने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला होता. यावेळी पालखी सोहळ्याचे प्रस्थान अंबर्ले गावचे सामाजिक कार्यकर्ते सितारामशेठ उभारे यांच्या निवास स्थानातून करण्यात आले होते. या वेळी रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते पालखीचे विधिवत प्रस्थान झाले. त्यावेळी अंबर्ले गावातील नागरिक, भाविक त्याचबरोबर परिसरातील तीनही गावांतील भाविक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित राहुन सहभागी झाले होते.

प्रस्थानानंतर पालखी गावदेवी मंदिरात रात्री दहा वाजता पोहोचली. त्यानंतर पालखी सोहळा, सासन काठी मिरवणूक आणि पारंपारिक वादनांनी संपूर्ण गावात आनंदी उत्सवाचे भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. त्यानंतर पुढे पालखी हनुमान मंदिरात मुक्कामी ठेवण्यात आली. रात्री उशिरापर्यंत सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. 'सारेगमपा कोल्हापूर' या ऑर्केस्ट्राच्या सादरी करणाने उपस्थित प्रेक्षक, श्रोत्यांची मने जिंकली. पहाटे तीन वाजल्या पासून भजन मंडळांनी अखंड भजन सेवा सादर केली. त्यानंतर हनुमान जन्मोत्सव मोठ्या भक्ति भावाने साजरा करण्यात आला.



या कार्यक्रमाला ना. भरत गोगावले यांच्यासह भाजप पदाधिकारी नाना महाले, युवराज मुंडे, बिपिन दादा महामूणकर तसेच उबाठा पक्षाचे नरेश आहीरे, मधुकर नाडकर यांच्यासह लोणेरे, गोरेगाव परिसरातील विविध मान्यवर यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. एकूणच, भक्ती, परंपरा आणि एकजुटीचा संगम असलेला हा उत्सव अंबर्ले गावासाठी अभिमानाचा ठरला.

# केकेआर वि. पंजाब सामना अनिर्णित

## पावसामुळे दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण



**कोलकाता : वृत्तसंस्था**

कोलकाताच्या ईडन गार्डन्सच्या मैदानातील कोलकाता नाईट रायडर्स आणि पंजाब किंग्स यांच्यातील सामना पावसाच्या व्यत्ययामुळे सामना अनिर्णित राहिला. आउटफिल्डवरील ओलाव्यामुळे प्रत्येकी पाच षटकांचा खेळही शक्य नसल्यामुळे दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण देण्यात आला.

कोलकाताचा कर्णधार अजिंक्य रहाणे याने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पहिल्यांदा फलंदाजी करताना फिन ॲलन ६ (७) आणि कोलकाता नाईट रायडर्सच्या ताफ्यातील सर्वात महागडा गडी कॅमरून ग्रीन ४ (२) स्वस्तात माघारी परतले. केकेआरच्या धावफलकावर ३.४ षटकात २ बाद २५ धावा असताना पावसामुळे खेळ थांबला.

कट ऑफ टाइमनुसार निकालासाठी प्रत्येकी-पाच-पाच षटकांचा सामना घेणेही शक्य नसल्याने शेवटी हा सामना रद्द झाल्याचे घोषित करत दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण देण्यात आला. पावसाच्या बॅटिंगच्या जोरावर मिळालेल्या एका गुणासह तिसऱ्या अनिर्णित सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सच्या संघाने यंदाच्या हंगामात खाते उघडले. दुसरीकडे पंजाबच्या संघाला दोन सामन्यातील दमदार कामगिरीनंतर एका गुणावर समाधान मानावे लागले.

अजिंक्य रहाणे याने नाणेफेक जिंकल्यावर पहिल्यांदा फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पावसाच्या वातवणामुळे सामन्यात गोलंदाजांना मदत मिळेल, अशी परिस्थितीत असताना त्याने पहिल्यांदा फलंदाजी निवडली. जर प्रत्येकी पाच षटकांचा सामना झाला असताना तर कोलकाताच्या संघाला पहिल्यांदा फलंदाजी करण्याचा निर्णय महागात पडला असता, पण पावसाच्या बॅटिंगमुळे शेवटी सामना अनिर्णित राहिला अन् निर्णय चुकीचा निर्णय घेऊन फसलेला अजिंक्य रहाणे वाचला. एवढेच नाही तर कोलकाता नाईट रायडर्सने एका गुणासह यंदाच्या हंगामातील खातेही उघडले.

सलामीच्या सामन्यात मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सामन्यात पराभवाचा सामना केल्यावर घरच्या मैदानात सनरायझर्स हैदराबादनेही कोलकाता नाईट रायडर्सला घरच्या मैदानात दणका दिला होता. या सामन्यात नाणेफेक जिंकून अजिंक्य रहाणे याने पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. धावांचा पाठलाग करण्यात अपयशी ठरल्यावर खेळपट्टीचा अंदाज चुकला असे म्हणत अजिंक्य रहाणेने आपली चूक मान्य केली होती. सातत्यपूर्ण खराब कामगिरीमुळे कॅप्टन्सीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असताना पुन्हा एकदा त्याने चुकीचा निर्णय घेतला, पण पावसामुळे सामना अनिर्णित राहिल्यामुळे तो वाचला.



## स्वराज्य संघाने मराठा चषक जिंकला

**पनवेल : वार्ताहर**

खांदा कॉलनी, पनवेल सकल मराठा समाज मंडळ आयोजित मराठा चषक २०२६ (पर्व चौथे) ही ओव्हरआर्म क्रिकेट स्पर्धा नुकतीच महात्मा शाळेच्या मैदानावर उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या स्पर्धेत स्वराज्य एमआयडीसी संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपद पटकावले. सूर्योदय संघ उपविजेता ठरला, तर साई ११ संघाने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

स्पर्धेत एकूण १४ संघांनी सहभाग नोंदवला होता. सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून खेळाडूंना प्रोत्साहन दिले. या यशस्वी आयोजनामागे सकल मराठा समाज मंडळाचे अध्यक्ष संतोष जाधव, सचिव सदानंद शिर्के व कार्यकारी मंडळ सदस्य, सल्लागार, सभासद यांची मेहनत घेतली. नियोजन व व्यवस्थापनाची जबाबदारी संजय मत्रे, तर निवेदक म्हणून योगेश वाघ, दत्ता धोंडे यांनी पार पाडली.

## प्रीती पवार आशियाई बॉक्सिंगच्या अंतिम फेरीत

### ऑलिम्पिक कांस्यपदक विजेतीवर मात



**उलानबटार : वृत्तसंस्था**

भारताची उदयोन्मुख बॉक्सिंगपटू प्रीती पवारने पॅरिस ऑलिम्पिक कांस्यपदक विजेत्या कोरियाच्या एजी इमला पराभूत करत आशियाई बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेत अंतिम फेरीत धडक मारली आहे. अनुभवी निकहत झरीन आणि लवलिना बोरगोहेन यांना मात्र पराभवाचा सामना करावा लागला.

प्रिया आणि अरुंधती चौधरी या अन्य दोघी भारतीय खेळाडूंनीदेखील उपांत्य फेरीतील विजयासह आपली सुवर्ण घोडदौड कायम राखली. निकहत, लवलिनाप्रमाणे जागतिक पदक विजेती पूजा राणी आणि अंकुशिता बोरो यांनादेखील उपांत्य फेरीतील पराभवामुळे कांस्यपदकावर समाधान मानावे लागले.

आशियाई क्रीडा स्पर्धेतील कांस्यपदक विजेती प्रीतीचा विजय उपांत्य फेरीतील सर्वात आकर्षक ठरला. तिने अत्यंत संयमी आणि प्रभावी कामगिरी करत तिन्ही फेऱ्यांमध्ये इमवर वर्चस्व गाजवले आणि ५-० असा एकतर्फी कौल मिळवला. आता सुवर्णपदकासाठी तिचा सामना तीनवेळची जागतिक विजेती तैवानच्या हुआंग हसियाओ-वेनशी होईल.

महिलांच्या ६० किलो वजनी गटात प्रियाने स्थानिक खेळाडू नामून मोंखोर हिच्याविरुद्ध ५-० असाच एकतर्फी कौल मिळविला. विजेतेपदासाठी तिचा सामना उत्तर कोरियाच्या उन ग्योंग वॉनशी होईल. अरुंधतीने ७० किलो गटात उझबेकिस्तानच्या ओयशा टोइरोव्हावर ४-१ असा विजय मिळवत सर्वांना प्रभावित केले. अंतिम फेरीत तिचा सामना कझाकस्तानच्या बाकित सेदिशशी होईल.

## संजू सॅमसनला आयसीसी पुरस्काराचे नामांकन

**दुबई : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा धडाकेबाज फलंदाज संजू सॅमसन याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. आयसीसीने मार्च महिन्यातील 'प्लेयर ऑफ द मंथ' या पुरस्कारासाठी संजूला नामांकन जाहीर केले आहे. विशेष म्हणजे, या शर्यतीत भारताचा अनुभवी वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि दक्षिण आफ्रिकेचा कॉनर एस्टरहुइजन यांचेही नाव असून आता या तिघांमध्ये चुरस पहायला मिळणार आहे.

सरलेल्या आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धेत संजू सॅमसनची कामगिरी अत्यंत प्रभावी राहिली. स्पर्धेच्या सुरुवातीच्या सामन्यांमध्ये त्याला अंतिम अकरामध्ये स्थान मिळाले नव्हते. संधी मिळाल्यानंतरही सुरुवातीला त्याला मोठी धावसंख्या उभारता आली नाही, मात्र जशी स्पर्धा पुढे सरकली, तशी संजूने आपल्या बॅटची कमाल दाखवत सर्वांना थक्क केले. आता आयसीसीने त्याच्या या सातत्यपूर्ण कामगिरीची दखल घेत त्याला गौरविले आहे.

### बुमराहशी स्पर्धा



टी-२० विश्वचषकात संजू सॅमसनचा खरा फॉर्म मार्च महिन्यातील निर्णायक सामन्यांमध्ये दिसून आला. वेस्ट इंडिजविरुद्धच्या 'करो या मरो'च्या सामन्यात संजूने नाबाद ९७ धावांची खेळी करून भारताला उपांत्य फेरीत पोहचवण्यात मोलाची भूमिका बजावली. न्यूझीलंडविरुद्धच्या विजेतेपदाच्या लढतीतही त्याने पुन्हा एकदा ८९ धावा फटकावत संघाच्या विजयात योगदान दिले.

आयसीसी स्पर्धेच्या बाद फेरीत सलग तीन अर्धशतके झळकावल्यामुळे संजूला 'प्लेयर ऑफ द टूर्नामेंट' या पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले होते. केवळ मार्च महिन्याचा विचार केला, तर संजूने १३७.५०च्या सरासरीने आणि १९९.२७च्या स्ट्राईक रेटने तब्बल २७५ धावा कुटल्या आहेत.

पुरस्काराच्या या शर्यतीत भारताचा हुकमी एक्का जसप्रीत बुमराह याचेही नाव अग्रक्रमाने आहे. भारताला विश्वविजेतेपद मिळवून देण्यात बुमराहचा वाटा मोलाचा होता. या दोन भारतीयांव्यतिरिक्त दक्षिण आफ्रिकेच्या कॉनर एस्टरहुइजन यालाही नामांकन मिळाले आहे. त्यानेही मार्च महिन्यात अष्टपैलू कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. आता या तिघांपैकी आयसीसीचा हा बहुमान कोणाला मिळतो, याची उत्सुकता क्रिकेट चाहत्यांना लागली आहे.




## पीपीएल क्रिकेट स्पर्धा उत्साहात

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ सेक्टर ८ येथे पीपीएल अंडर आर्म डे -नाईट क्रीडा स्पर्धा मोठ्या उत्साहात झाली. या स्पर्धेत सहा संघांनी भाग घेतला होता.

शिवसेना माजी नगरसेवक रतन मांडवे, युवासेना नवी मुंबई सरचिटणीस निखिल मांडवे यांच्या प्रमुख उपस्थितीत दोन दिवस पार पडलेल्या या सागर बॉईज संघाने विजेतेपद पटकाविले. सचिन बॉईज संघ उपविजेता ठरला. दोन्ही संघांना रोख रक्कम, ट्रॉफी प्रदान करण्यात आली.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी गणेश पवार, सुधीर वाघमारे, हरेश पाटील आणि किरण कुंभारकर यांनी मेहनत घेतली.

## हैदराबादी बिर्याणी खाताच क्लासेनच्या डोळ्यात पाणी



**हैदराबाद : वृत्तसंस्था**

सनरायझर्स हैदराबाद संघाचा स्फोटक फलंदाज हेनरिक क्लासेन यंदा उत्कृष्ट फॉर्मात आहे. लखनऊविरूद्धच्या सामन्यातही त्याने महत्त्वपूर्ण खेळी करत संघाचा डाव सावरला. मैदानावर जबरदस्त कामगिरी करणारा लासेनला मैदानाबाहेर मात्र घाम फुटला आहे. हैदराबादी बिर्यानी खाताना क्लासेनच्या डोळ्यातून पाणी आले, ज्याचा व्हिडीओ सध्या व्हायरल होत आहे.

दक्षिण आफ्रिकेच्या या खेळाडूला हैदराबादी बिर्याणीची चव चाखणे महागात पडल्याचे दिसत आहे. नितीश कुमार रेड्डीने शेअर केलेल्या या व्हिडीओमध्ये कर्णधार इशान किशनही उपस्थित आहे. क्लासेनची अवस्था पाहून इशानला हसू आवरले नाही. इतर खेळाडूही क्लासेनच्या या प्रतिक्रियेवर हसताना कॅमेऱ्यात कैद झाले असून नेटकऱ्यांनी यावर मजेशीर कमेंट्सचा पाऊस पाडला आहे.

## अर्शदीप सिंग अभिनेत्री समरीनला करतोय डेट?



**चंदिगड : वृत्तसंस्था**

टीम इंडियाचा गोलंदाज अर्शदीप सिंग सध्या आयपीएलमधील प्रिती झिंटाच्या पंजाब किंग्स संघातून खेळताना दिसत आहे. तो सध्या फिल्डबाहेरील प्रेमाच्या खेळामुळे चर्चेत आला आहे. अर्शदीपने स्नॅपचॅट हँडलवरून एक खास फोटो शेअर केला आहे, ज्यात तो एका तरुणीचा हात हातात घेऊन बसल्याचे दिसते.

फोटो व्हायरल झाल्यावर अर्शदीप सिंगच्या आयुष्यात आलेली सुंदरी कोण? याची उत्सुकता त्याच्या चाहत्यांमध्ये पहायला मिळत आहे. क्रिकेटरने तिचा चेहरा लपवला असला तरी फोटोत दिसणाऱ्या तरुणीच्या हातावरील टॅटू पाहून ती मिस्ट्री गर्ल कोण? तिचे नाव काय? हे नेटकऱ्यांनी शोधून काढले आहे.

अर्शदीप हा मॉडेल आणि अभिनेत्री समरीन कौर हिच्यासोबत डेट करत असल्याचे बोलले जात आहे. जम्मू-काश्मीरची समरीन ही २०१८मध्ये फेमिना मिस इंडिया स्पर्धेतील फायनलिस्ट राहिली आहे. ती पंजाबी आणि हिंदी संगीत क्षेत्रातील लोकप्रिय चेहरा आहे. अनेक गाण्यात तिची अदाकरी पहायला मिळाली आहे.

अर्शदीपने जो फोटो शेअर केलाय त्यात तरुणीच्या हातावर एक टॅटू दिसतो. या टॅटूवरून ही तरुणी समरीन कौर असल्याचा दावा करण्यात येत आहे. समरीनच्या डाव्या हाताच्या अंगठ्याच्या वरच्या बाजूला टॅटूची जी डिझाईन दिसून येते तीच डिझाईन अर्शदीपने शेअर केलेल्या फोटोतही दिसते. त्यामुळे या दोघांच्या डेटिंगचा खेळ रंगल्याची हिंट मिळत आहे. दोघांनीही अधिकृतरित्या या संदर्भात कोणतेही भाष्य केलेले नाही.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com